


## विशेष संपादकीय

### ... म्हणून महामानव

व भविष्याचा अचूक वेध घेण्याची क्षमता या एका गुणाचाच केवळ आधार घेतला तरी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नेतृत्व अजोड ठरते. भविष्याचा वेध घेण्याची बाबासाहेबांची क्षमता विलक्षण होती. त्यांच्या द्रष्टेपणाला तत्त्वज्ञानाची धार होती. डॉ बाबासाहेबांनी भारताच्या भविष्याचा वेध घेतला तो तत्त्वज्ञ या भूमिकेतून. मात्र, ते अजिबात स्वप्नाळू नव्हते. देशाची वास्तव परिस्थिती काय आहे याची स्पष्टसमज त्यांना होती. वास्तवाशी जवळीक ठेवण्याची बौद्धिक शिस्त डॉ. बाबासाहेबांनी बाणवली असल्यामुळेच कदाचित भगवान बुद्ध त्यांना आपलेसे वाटले. कारण कोणताही भ्रम निर्माण करण्यास ठाम नकार हा बुद्धांच्या साधनेचा पाया आहे.

वास्तवावर पक्की कमांड ठेवून भविष्याचा वेध घेत असल्यामुळेच डॉ. बाबासाहेबांनी ६० वर्षांपूर्वी उभे केलेले भारताचे चित्र दुर्दैवाने आज तंतोतंत खरे ठरते. डॉ. बाबासाहेबांनी हा वेध फक्त राजकारणातून घेतला नाही तर भारतीयांची मानसिक व बौद्धिक स्थिती लक्षात घेऊन घेतला. भारतीय समाजाच्या सवयी, क्षमता व मयार्दा यांचे उत्तम भान त्यांना होते. घटना समितीसमोर नोव्हेंबर १९४९मध्ये केलेले ऐतिहासिक भाषण याची साक्ष देते. भारत कसा असावा व तो तसा घडविण्यासाठी राज्यघटना कशी उपयोगी आहे याच दिशादिग्दर्शन करीत असतानाच भारत कसा होऊ शकतो, याचे स्पष्ट इशारे देण्याचे कर्तव्य डॉ. बाबासाहेबांनी बजावले. देशाच्या भविष्याचा असा तौलनिक वेध अन्य कुणा नेत्याकडून घेतला गेलेला दिसत नाही. डॉ. बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाची उत्तुंगता व क्षमता याची ओळख करून घेण्यासाठी हे एकमेव भाषण पुरसे ठरते. भारताची प्रगती होण्यासाठी लोकशाही मार्गाशिवाय अन्य चांगला मार्ग नाही याबद्दल डॉ. बाबासाहेब ठाम होते. लोकशाही ही त्यांची निष्ठा होती. लोकशक्तीवर त्यांचा भर होता. मात्र, ही लोकशक्ती चुकीच्या मार्गानें जाऊ शकते याचे भान त्यांना होते. लोक करतात ते सर्व काही बरोबर, असे त्यांनी कधीही मानले नाही. आपण तयार केलेली राज्यघटना कितीही उत्तम असली तरी शहाण्या लोकांच्या हाती ती गेली नाही तर त्याची माती होईल, हे सांगण्यास ते कचरत नाहीत. वाईट राज्यघटना असली तरी शहाणे लोक त्यातून चांगला कारभार करू शकतात आणि चांगल्या राज्यघटनेतूनही वाईट कारभार होऊ शकतो असे त्यांनी म्हटले होते. गेल्या साठ वर्षांतील प्रत्येक पक्षाचा कारभार याची प्रचिती आणून देतो. कारभार कसा करावा याची उत्तम चौकट आपल्याकडे आहे. मात्र, तसा कारभार करणारी माणसे नाहीत आणि त्यामुळे कारभार यशस्वी होत नाही. तथापि, माणसांतील या दुगुणाकडे लक्ष न देता व्यवस्था बदलण्याची भाषा सतत होत असते. या देशात लोकशाहीचा ढाचा असेल पण त्यामध्ये लोकशाहीचा आत्मा कायम राहील का, अशी शंका डॉ. बाबासाहेबांनी बोलून दाखविली आहे. लोकशाहीचा फॉर्म व लोकशाहीची फॅक्ट यामध्ये ते फरक करीत होते.

अध्यात्मातील भक्तिभाव भारतीयांनी जीवनाच्या सर्व क्षेत्रांत आणला आहे व असे करण्यात लोकशाहीला धोका आहे, असे डॉ. बाबासाहेबांचे प्रतिपादन होते. एखाद्या व्यक्तीबद्दल वा नेत्याबद्दल कृतज्ञता बाळगणे, त्याच्या महान कार्याबद्दल नतमस्तक होणे हे योग्य असले तरी त्याला मयार्दा पाहिजे. भारतीय समाजात ही मयार्दा पाळली जात नाही. नतमस्तक होण्याला महत्त्व आले की पक्षात व सरकारमध्ये हुकूमशाहीचा शिरकाव होतो. केवळ सरकारच नव्हे, तर प्रत्येक संस्थेमध्ये, प्रशासनात, व्यवसायात हीच वृत्ती बोकाळलेली दिसते. नतमस्तक होण्याला निष्ठा असे गोंडस नाव दिले जाते. डॉ. बाबासाहेबांना हे मान्य नव्हते. नतमस्तक होण्याची मयार्दा कोणती हे डॉ. बाबासाहेबांनी सुंदर रीतीने दाखविले आहे. पुरुषाने आत्मसन्मान सोडून, स्त्रीने चारित्र्य सोडून व राष्ट्राने स्वातंत्र्य गमावून नतमस्तक होणे हे अत्यंत घातक आहे, असे डॉ. बाबासाहेबांनी स्पष्टपणे म्हटले आहे. ही मयार्दा काँग्रेस पक्षातच पहिल्यांदा सुटली. त्यातून आणीबाणी आली. पुढे हीच काँग्रेस संस्कृती अन्य पक्षांत शिरली. भाजपही त्यातून सुटलेला नाही. भाटगिरी हा सामाजिक स्वभाव झाला आहे. स्वातंत्र्य मिळताच हुकूमशाहीचा अप्रत्यक्ष इशारा डॉ. बाबासाहेबांनी दिला होता. तो २५ वर्षांतच खरा ठरला. कारण भारतीय मानसिकतेची उत्तम जाण डॉ. बाबासाहेबांना होती.लोकशाहीसमोरच्या धोक्याबद्दल डॉ. बाबासाहेब अतिशय जागरूक असण्याचे एक कारण म्हणजे भारताला लोकशाही नवीन नाही, मात्र सामाजिक चुकांमुळे ती गमावली, अशी त्यांची अभ्यासानंतर खात्री झाली होती. भारतीय इतिहासातील चांगल्या गोष्टी त्यांनी कधीही नाकारल्या नाहीत. भारतावरचे आजचे टीकाकार व डॉ. बाबासाहेब यांच्यात हा महत्त्वाचा फरक होता. भारतात लोकशाही होती, मात्र ती लुप्त झाली आणि आता ती आपल्याला नव्याने भेटत आहे, ती पुन्हा गमावू नका, अशी मांडणी बाबासाहेबांनी केली होती. बुद्धांच्या संघामध्ये लोकशाहीची तत्त्वे दिसतात, कारण आजूबाजूच्या राज्यकारभारात ती तत्त्वे आचरली जात होती, असे डॉ. बाबासाहेबांचे प्रतिपादन आहे. लोकशाहीला सामाजिक अर्थ दिला न गेल्यामुळे ती भारतातून लुप्त झाली. आता ती टिकवायची असेल तर एक साधन म्हणजे राज्यघटना व दुसरे म्हणजे लोकशाहीचा सामाजिक आशय अधिकाधिक गडद करणे. राजकीय लोकशाहीपेक्षा सामाजिक लोकशाही महत्त्वाची ठरते. लोकशाहीची व्यवस्था व आचरण यासंदर्भात डॉ आंबेडकरांइतके सर्वंकष काम कोणीही केले नाही. भारतीय लोकशाहीचे ते सर्वार्थानें लोकनायक होते.१३४ व्या जन्मदिनी त्यांचे स्मरण करत असताना त्यांनी दिलेल्या इशाऱ्याकडे दुर्लक्ष होता कामा नये. लोकशाहीच्या फॉर्मचे कौतुक करण्यापेक्षा आता फॅक्टकडे वळले पाहिजे.



## अमानुष मारहाणीच्या १५० जखमा !


### सरपंच संतोष देशमुखांना गॅस पाईप, लोखंडी रॉडने मारहाण

पुण्यभूमी प्रतिनिधी

केजःतालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या अपहरणानंतर त्यांच्यावर अमानुष मारहाण झाल्याचा धक्कादायक अहवाल समोर आला आहे. या प्रकरणात आरोपींनी देशमुख यांना गॅसचा पाईप, गाडीच्या वायरचा चाबूक, बांबूची काठी आणि लोखंडी पाईप यांसारख्या चार विशेष हत्यारांचा वापर करत बेदम मारहाण केली होती. या हल्ल्याचे व्हिडीओ रेकॉर्डिंग देखील करण्यात आले होते. मिळालेल्या माहितीनुसार, देशमुख यांच्या शरीरावर तब्बल १५० पेक्षा अधिक जखमा आढळून आल्या आहेत. या मारहाणीत वापरण्यात आलेल्या हत्यारांचा फॉरेन्सिक अहवाल समोर आला असून, या सर्व हत्यारे 'कराड गँग'ने तयार केल्याचा उल्लेख या अहवालात करण्यात आला आहे. या अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे की, या हत्यारांचा वापर केल्यास कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू होऊ शकतो, आणि अशाच प्रकारे देशमुख यांच्यावर हल्ला करण्यात आला होता. याआधीह आरोपींनी इतर व्यक्तींवर हेच हत्यारे वापरून हल्ल केल्याचे उघड झाले आहे. तपास यंत्रणेकडून हा अहवाल आत न्यायालयात सादर करण्यात आला असून, या प्रकरणाच्य तपासात तो महत्त्वाचा ठरणान आहे. संतोष देशमुख यांच मृत्यू ही पूर्वनियोजित आणि अमानुष कृत्य असल्याचे य अहवालातून अधोरेखित होत आहे.

## १८ तास अभ्यास करून अभिवादन

### उपक्रम:सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचा उपक्रम



पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव:डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त सुंदरराव सोळंके महाविद्यालयात १८ तास अभ्यास अभियान राबवून महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले.

सुंदरराव सोळंके महाविद्यालय व क्रांतीसुर्य म. ज्योतिबा फुले सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील राजर्षी शाहू महाराज ग्रंथालयात १८ तास अभ्यास अभियान राबविण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन जेष्ठ पत्रकार उमेशजी मोगरेकर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. एम. ए. कव्हळे होते तर पत्रकार उमेश जेथलिया, प्रा. सुदर्शन स्वामी, अशोक मगर सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब ताकट,उपप्राचार्य डॉ. एन. के. मुळे, उपप्राचार्य प्रा पवन शिंदे ,पर्यवेक्षक महादेव अलझेंडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त देशभरात विविध उपक्रम साजरे केले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून विद्यार्थ्यांसाठी आठरा तास अभियान उपक्रम घेण्यात आला. यावेळी उद्घाटनपर भाषण करताना उमेशकाका मोगरेकर म्हणाले की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व कार्य देशालाच नाही तर जगाला प्रेरणादायी व दिशादर्शक आहे.समताभिमुख समाज घडविण्यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान महत्वाचे आहे. यावेळी उमेश जेथलिया म्हणाले की, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा जयघोष सर्वमान्य झाला आहे. आठरा तास अभ्यासामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासाची आवड निर्माण होईल.

अध्यक्षीय समारोप करताना डॉ. एम.ए.कव्हळे म्हणाले की वाचनाने सत्य आणि असत्य यातील फरक समजतो. त्यामुळे मस्तक जाग्यावर राहून माणूस कोणाचा हस्तक होत नाही. प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्तावित प्रा.संजय बागुल यांनी केले. सूत्रसंचालन बी. एस. बनसोडे यांनी केले तर आभार उपप्राचार्य प्रकाश गवते यांनी मानले.यावेळी विद्यार्थी - विद्यार्थीनी, प्राध्यापक, ग्रंथालय कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# बाबासाहेब म्हणाले होते



–डॉ. नंदकुमार उघाडे



भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, रूढी परंपरेच्या जाचक बंधनात चाचपडणाऱ्या , अन्याय अत्याचार सहन करत जीवन जगणाऱ्या समाजाला माणुसकीचे जीवन जगण्याचा मार्ग सुखकर करून त्यांचे राजकीय, सामाजिक , आर्थिक , शैक्षणिक व सांस्कृतिक जीवन उंचावणाऱ्या विश्वरत्न डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीनिमित्त अभिवादन करतो.

मुंबई येथे १२ डिसेंबर १९३८ रोजी अस्पृश्य विद्यार्थ्यांचे संमेलन भरले होते. या संमेलनात डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यक्षीय भाषण करताना म्हणतात की, अशा प्रकारची संमेलने अनेकदा होतात , संमेलनाला अध्यक्ष किंवा प्रमुख पाहुणा म्हणून कोणीतरी येतो आणि तो विद्यार्थ्यांना एक टोमणा मारत असतो. तुम्ही शिकून काय करणार ? सरकारी नोकरी ? त्यांना देशसेवा करण्याचाही उपदेश केला जातो . पण यात काही हांशील होत नाही. बाबासाहेब म्हणतात, विद्यार्थ्यांसंबंधी मी जो काही विचार केला आहे यावरून मी असे सांगू इच्छितो की, हा उपदेश खोटा आहे आणि मी तसाच उपदेश करणार नाही. विद्यार्थ्यांनी शिक्षण पूर्ण केल्यानंतर नोकरी केली तर त्यात काय पाप आहे ? त्याला आयुष्य आहे त्याला भावना आहेत , प्रत्येक मनुष्याचे अंतिम ध्येय काय आहे ? आपल्या अंगी असलेल्या गुणांचा परिपोष होऊन त्याला गोड फळे यावीत हेच ध्येय आहे. म्हणून मी तुम्हाला उपदेश करीत नाही. तुम्ही सरकारी नोकऱ्या मिळविण्याचा आटोकाट प्रयत्न करावा . मला असा अनुभव आला आहे की सरकारी नोकरी हल्ली एका जातीचा मक्ता होऊन बसलेली आहे. कोणत्याही ऑफिसमध्ये एकाच जातीची माणसे आहेत. पुष्कळ माणसं असे सांगतात की तुम्ही नोकरीसाठी का भांडता . लायकी असली की नोकरी मिळते . त्यात जातीचा कशाला प्रश्न ? परंतु आपल्या सामाजिक परिस्थितीचा विचार केल्यास असे दिसून येते की, या देशात जाती भेदाचे प्रस्त फार आहे. ज्याच्याजवळ पैसा आहे त्याच्याच हती खरी सत्ता आहे. तो सत्तेचा सद्भावनेने उपयोग न करता आपल्याच पोळीवर तूप ओढून घेतो. ज्या समाजाला सरकारी नोकऱ्या नाहीत , जो समाज अधिकाराच्या जागेवर नाही , त्याची ऊर्जितावस्था होणार नाही. ब्राह्मण समाज सरकारी नोकरीत गुंतलेला आहे त्यामुळे त्यात सामर्थ्य आहे व तो आपले वर्चस्व गाजू शकतो. म्हणून तुम्ही सरकारी नोकऱ्या मिळवण्याचा प्रयत्न करा.

बाबासाहेब पुढे म्हणतात , शिकलेल्या माणसात काही दोष असतात. शिकल्यावर नोकरीच्या पाठीमागे लागणे हा दोष नव्हे. दोष व अवगुण तुमच्या अंगी बाळगू नका. मनुष्य स्वार्थी असणे हे स्वाभाविकच आहे परंतु शिकलेला मनुष्य स्वतःचे हित पाहतो समाजाचे पाहत नाही. तो आपल्या बायको पोराची व स्वतःच्या हिताचीच काळजी घेतो. जोसेफ मॅझिनीने असे म्हटले आहे की , लोकांत पारतंत्र्य पसरले , माणसे शिकली तरी त्यांच्यात कर्तव्यापेक्षा हक्काची जाणीव जास्त उत्पन्न होते. आपले कर्तव्य कोणते आहे याची भावना जागृत होत नाही हा एक शिकलेल्या माणसाचा दोष आहे. शिक्षणाचे महत्त्व सांगताना बाबासाहेब म्हणतात की , मला खेद वाटतो की शिकलेल्या मनुष्यास पदवी मिळाली आणि त्याला नोकरी लागली की त्याचा विद्यार्जनाचा मार्ग सुटतो. विद्येचे महत्त्व खुंटले जाते.

एखादा व्यक्ती बी ए किंवा एम ए झाला म्हणजे त्याने सर्व ज्ञान संपादन केले ही भावना चुकीची आहे. एखादी पदवी मिळवली म्हणजे आपण सर्व विद्या हस्तगत केली असे शिकलेल्या लोकांना वाटते. बडोदा संस्थानात एक कर्मचारी होता. तो बी ए झाला होता. महाराजांनी त्याची नेमणूक एका खेडेगावात केली होती. त्यावेळी बडोदा संस्थानाचे दप्तर गुजराती भाषेतून चालत असे इंग्रजीतून चालत नसे. तो कर्मचारी फार आळशी होता कधी चुकून टाइम्स देखील वाचत नसे. याचा परिणाम असा झाला की काही वर्षानंतर त्याला एबीसी ची देखील ओळख राहिली नाही हे अगदी सत्य आहे. म्हणून विद्येचा व्यासंग नेहमी केला पाहिजे. परीक्षा झाल्यानंतर जो आपली पुस्तके बाजारात विकतो त्याला विद्येची गोडी आहे असे म्हणता येणार नाही.

जगात फक्त जगणे हेच जर ध्येय असेल तर पशु आणि माणूस यात फरक काय ? माणूस सौंदर्याची साठवण करू शकतो पशुला ते करता येत नाही. नुसती कॉलर ताट करून आणि नेक टाय बांधून सौंदर्य वाढत नाही. बाबासाहेब म्हणतात , बायबलमध्ये मी वाचले आहे की , मीठच जर आळणी झाले तर बाकी पदार्थांना चव कशी येणार ! कोणतेही कार्य करण्यासाठी आपल्या अंगी असलेले गुण स्थिरावले पाहिजेत . स्वतः सुधारल्याशिवाय इतरांना तुम्ही काय शिकवणार ? सुधारणेचे मूळ वंशपरंपरा रुतले गेले पाहिजे. तुमच्यात या गुणांचा जर अभाव असेल तर आटोकाट प्रयत्न करून ते मिळवा.

## डिजिटल मीडियाची सोपविली धुरा

### अभिनंदनिय: अहिल्यानगर उत्तर जिल्हाध्यक्षपदी श्रीकांत जाधव

पुण्यभुमी प्रतिनिधी



नगर:महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या डिजिटल मीडिया विभागाच्या अहिल्यानगर उत्तर जिल्हाध्यक्षपदी श्रीकांत जगन्नाथ जाधव यांची निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने सांगली येथे डिजिटल मीडिया अधिवेशन पार पडले.प्रसंगी डिजिटल मीडिया विभागाच्या जिल्हाध्यक्ष पदाच्या निवडी पार पडल्या. यावेळी राहुरी येथील युवा पत्रकार श्रीकांत जाधव यांची अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली.

या प्रसंगी शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, आ.गोपीचंद पडळकर, अशोक वानखेडे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ.विश्वास आरोटे, राज्य संघटक संजय भोकरे प्रदेश प्रसिद्धीप्रमुख नवनाथ जाधव, प्रदेश उपाध्यक्ष अशोक देडे, पत्रकार संघाचे प्रवक्ते रमेश डोंगरे, अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष दत्ता गाडगे, शहर जिल्हाध्यक्ष गणेश अंबिलवादे आदी उपस्थित होते.

## मुंडेंचा आपल्या माणसांशी संवाद

### पंकजा मुंडे:जनतेच्या सेवेसाठी सदैव तत्पर

पुण्यभूमी प्रतिनिधी



मुंबई:राष्ट्रसंत भगवान बाबा, संत वामनभाऊ, संत गहिनीनाथ महाराज यांचे विचार सप्ताहाच्या माध्यमातून जोपासण्याचे काम आपण सर्व करत आहात, हे अतिशय कौतुकास्पद आहे. कीर्तन श्रवणाने भावी पिढीवर चांगले संस्कार होतात, ज्याची आज खरी गरज आहे असे सांगत जनतेच्या सेवेसाठी आणि त्यांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी सदैव तत्पर आहोत अशा शब्दांत राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी भाविकांशी संवाद साधला.

चेंबूर मुंबई येथील इंदिरानगर भागात श्री वैजनाथ सेवा मंडळाच्या वतीने आयोजित अखंड हरिनाम सप्ताह आणि ज्ञानेश्वरी पारायण सांगता ना. पंकजाताई मुंडे यांच्या उपस्थितीत आज मोठया उत्साहात पार पडली, त्यावेळी त्या बोलत होत्या. ह.भ.प. बापू महाराज उखळीकर यांच्या काल्याच्या कीर्तन श्रवणाचा यावेळी त्यांनी लाभ घेतला. बीड, परळी व मराठवाड्यातील बहुतांश नागरिक या भागात वास्तव्यास आहेत. आपल्या जिवाभावाच्या माणसांशी यावेळी संवाद साधता आला याचा मनस्वी आनंद झाला असल्याचे सांगत त्या म्हणाल्या, मी मुद्दामहून सप्ताहाला उपस्थित राहिले. या भागात आपली माणसं राहतात, त्यांना खास भेटण्यासाठी इथे आले, त्यांनी केलेला हा उपक्रम खरोखरच स्त्युत्य असा आहे. याप्रसंगी वैजनाथ सेवा मंडळाच्या वतीने ना. पंकजाताई मुंडे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी आ. तुकाराम काते, सेवा मंडळाचे अध्यक्ष सोमनाथ इंगळे, बबन शिंदे, वाल्मिक गोल्हेर, राजाभाऊ आघाव, संदीप इंगळे आदींसह असंख्य भाविक उपस्थित होते.

## महावितरणच्या गुत्तेदारांची बोगसगिरी

### सवाल:गुत्तेदाराची पाठराखण कशासाठी

पुण्यभूमी प्रतिनिधी




केज:तालुक्यात कसलेही सिमेंट काँक्रीट न करता जमिनीच्या वर एक चौकोनी कप्पा करून फक्त सिमेंट टाकून चक्क दिशाभूल करण्याचे काम केज तालुक्यातील संबंधित गुत्तेदार करत असताना यावर नियंत्रण ठेवणारे महावितरणचे अधिकारी मात्र कसलीही कारवाई न करता उघड्या डोळ्यांनी सर्व भोंगळ कारभार पाहत असून बीड जिल्ह्याचे खमक्या पालकमंत्री मिळाले असून आता अजितदादांनी यांची चौकशी करून कानउघाडणी करण्याची मागणी केली जात आहे. गुत्तेदार आपली मनमानी करत असून केज तालुक्यात लाईट पोल उभारणीच्या कामात बट्ट्याबोळ असून संबंधित महावितरणचे अधिकारी कर्मचारी यांनी यावर लक्ष ठेवणे आवश्यक असतांना त्यांचे कसलेही लक्ष नसल्याने पुरती वाट गुत्तेदारानी लावत असून उभारणी केलेले पोल कधीही रस्त्यावर कोसळू शकतात आणि जनतेच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो तरी सुद्धा जराही गांभीर्य महावीतर च्या अधिकारी यांना नसेल तर अगोदर पालकमंत्री अजितदादांनी यांचीच चौकशी करून कानउघाडणी करणे गरजेचे आहे आणि सामाजिक कार्यकर्ते देखील याबाबत पालकमंत्री यांना भेटणार आहेत केज तालुक्यात तसेच राज्य रस्त्यावर वरील पोल त्यामुळे गुत्तेदार कसे निकृष्ट दर्जाचे काम करून निधी घशात जास्तीत जास्त कसा जाईल यासाठी प्रयत्न केले अतिशय निकृष्ट दर्जाचे काम केले जात आहे तरी अशा निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या भुरट्या गुत्तेदारांवर कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय पुरस्काराने सन्मान

### अभिनंदनिय:सुप्रसिध्द लेखक दिग्दर्शक डॉ.शरद गोरेंचा सन्मान

पुण्यभूमी प्रतिनिधी



पुणे:सुप्रसिध्द लेखक दिग्दर्शक व अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष व सुप्रसिद्ध लेखक दिग्दर्शक डॉ.शरद गोरे यांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय पुरस्काराने आज पुण्यात एका भव्य समारंभात विविध मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले गेली ३२ वर्ष श्री गोरे यांनी साहित्य संवर्धनाचे अतुलनीय कार्य करून आजवर १८२ हून अधिक राज्यस्तरीय राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय साहित्य संमेलनाचे यशस्वी आयोजन केले आहे इतकी साहित्य संमेलनं आयोजित करणारे ते साहित्य विश्वातील एकमेव व्यक्ती आहेत,५ मराठी चित्रपट त्यांनी लेखक दिग्दर्शक,संगीतकार व अभिनेता म्हणून केले आहेत, त्यांच्या एक प्रेरणादायी प्रवास सूर्या या चित्रपटास फ्रान्स देशातील कान्स आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव व जर्मनीतील बर्लिन आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात सर्वोत्कृष्ट चित्रपट म्हणून आपली जागतिक स्तरावर मोहर उमटवली आहे,ते मुख्य अभिनेता असलेला फुल टू हंगामा मराठी चित्रपट प्रदर्शनाच्या वाटेवर आहे,विविध विषयांवर आजवर दोन हजारांहून अधिक व्याख्याने त्यांनी दिली आहेत आपल्या अनोख्या भाषणशैलीसाठी ते विशेष परिचित आहेत,आजवर १० ग्रंथाचे विपुल लेखन केले आहे छत्रपती संभाजी महाराज यांनी वयाच्या १४ व्या वर्षी संस्कृत लिहिलेला बुधभूषण ह्या ऐतिहासिक ग्रंथाचा गोरे यांनी मराठीत काव्य अनुवाद केला आहे तो रसिकांच्या ह्रदयावर अधिराज्य गाजवत आहे, ते प्रकाशक व संपादक असलेल्या युंगधर प्रकाशन या संस्थेने १५० हून अधिक दर्जेदार पुस्तके प्रकाशित केली आहेत त्यांना मिळालेल्या या पुरस्कारासाठी समाजातील सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

## कबडी स्पर्धा उत्साहात संपन्न !

### जय बजरंग,केएसके ,अंबीका स्पोर्टस ग्रुपने मारली बाजी

पुण्यभूमी प्रतिनिधी



केज: तालुक्यातील चिंचोली माळी येथे श्री संत नामदेव महाराज यात्रा महोत्सवा निमीत्त जिल्ह्यस्तरीय भव्य खुल्या कबड्डी स्पर्धा धर्मवीर प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आल्या होत्या त्या कबड्डी स्पर्धेचे प्रथम बक्षीस वितरक म्हणून गावचे प्रथम नागरिक सरपंच रोहीनी सुनिल बापु देशमुख यांनी अनमोल असे बक्षीस दहा हजार एक रुपये दीले तसेच द्वितीय बक्षीस श्री संस्कार इंग्लिश स्कूलचे संचालक अनिल गलांडे यांनी सात हजार एक दीले आहे तसेच ग्रामपंचायत सदस्य रामभाऊ गलांडे यांनी सुध्दा बक्षीस दिले असे छोटे मोठे बक्षीस देण्यात आले त्यामुळे धर्मवीर प्रतिष्ठानच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले तसेच हर्षद गिरी व शुभम बजगुडे यांनी अफाट मेहनत स्पर्धेच्या आयोजनासाठी घेतली त्या बद्दल धर्मवीर प्रतिष्ठानचे गावकऱ्यांच्या वतीने कौतुकास्पद आभार व्यक्त केले जात आहे तसेच स्पर्धा ७ ते ११:३० वाजेपर्यंत चालल्या खो–खो स्पर्धेत सहभागी झालेल्या जय बजरंग,के एस के ,अंबीका स्पोर्टस ग्रुपने बक्षीस जिंकुन बाजी मारली व त्यांना बक्षीस सन्मान चिन्ह देऊन त्यांचे अभिनंदन गावकऱ्यांच्या व धर्मवीर प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे .

पान सहा वरून

**गेवराईत पत्रकाराचे घर**

दवाखाण्यात गेले होते. दरम्यान दि.८ एप्रिल २०२५ रोजी रात्री ९.३० वा.चे सुमारास घरी आले असता घराच्या दरवाजाला असलेला कोंडा कटरच्या सहाय्याने कट करुन दरवाजा अर्धवट उघडा असल्याचे दिसून आले त्यानंतर घरात प्रवेश करुन पाहीले असता घरातील पसारा अस्ताव्यस्त पाहताच घरात चोरट्यांनी चोरी केल्याचे निदर्शनात आले. दरम्यान घरातील कपाटाचा दरवाजा तोडून आतील साहीत्य अस्ताव्यस्त फेकलेले दिसले.त्यांनी ताबडतोब या घटनेची गेवराई पोलीस ठाण्याला माहिती दिली. पोलिसांनी घटनेचा पंचनामा केला असून कपाटातील लॉकर मधील सोन्याचांदीचे दागिने व नगदी रोख रक्कम असा एकूण एकोंसत्तर हजार तीनशे तीस रुपयांचा ऐवज अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याचे दिसून आले. दरम्यान याप्रकरणी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गेवराई पोलीस ठाण्यात कलम ३०५ (ए), ३३१ (४) भा. न्या. स.नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. घटनेचा पुढील तपास गेवराई पोलिस ठाण्याचे पो.नि.प्रविणकुमार बांगर, स.पो.नि. संतोष जंजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेड कॉन्स्टेबल धन्यपाल लोखंडे हे करत आहेत.

**संत नामदेव महाराज**

होईल म्हणजे यात्रा महोत्सव असेल व रविवार दि. २०/४/२०२५ रोजी सकाळी १० ते १२ ह. भ. प. गाथामुर्ती उमेश महाराज दशस्थ (मानवतकर) यांचे काल्याचे अमृततुल्य किर्तन होईल व नंतर महाप्रसाद होईल अशा प्रकारे सप्ताह पत्रीके प्रमाणे सप्ताहाची समाप्ती होईल तरी पंचक्रोशीतील भावि भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन गावकऱ्यांनी केले.

**येडेश्वरीच्या दारी भक्तीचा**

आले दरम्यान हेलिकॉप्टर मधून पालखीवर पुष्पवृष्टी करण्यात आली आई राजा उदो उदो चा जयघोष करत हलगी झांज संबळच्या गाजरात रविवारी येरमाळा येथील येडेश्वरी देवीच्या यात्रेत चुना वेचण्याचा मानाचा कार्यक्रम पार पडला चैत्र पौर्णिमा निमित्त भरलेल्या या यात्रा काळात रखरखत्या उन्हातही तेरा चौदा लाखापेक्षाही जास्त भाविकांनी येडाईच्या नगरीत हजेरी लावली होती भाविकांच्या अलोट गर्दीमुळे येडाई नगरी न्हाऊन निघाली येरमाळ्याच्या शिवारात रस्त्याच्या कडेला, शेतात, झाडाखाली भाविकांनी जागा मिळेल तिथे राहुट्या मांडल्या आहेत झाडांचा आधार घेत अनेकाने सावल्या सोधल्या आहेत विशेष म्हणजे भाविकांनी दोन ते तीन दिवसाच्या मुक्कामी राहण्याची तयारी केली आहे गेल्या दोन आठवड्यापासून उष्णतेची लाट असुनही भाविक देवीच्या श्रद्धेपोटी उन्हाची पर्वा न करता देवीच्या पालखीच्या दर्शनासाठी मंत्रमुग्ध झाल्याचे चित्र येडेश्वरी मंदिर, चुना वेचण्याच्या रानात व आमराई परिसरात दिसत होते आमराईच्या चौहो बाजूला दिसेल तिथपर्यंत भाविकांची गर्दी दिसून येत होती. या यात्रेसाठी भाविकांच्या गर्दीचा अंदाजा घेत मा.जिल्हाधिकारी पुजार व मा. पोलीस अधीक्षक यांनी चोख नियोजन केल्यामुळे वाहतूक कोंडी जाणवली नाही गावात येणारी अवजड वाहने बाह्यवळण रस्त्याने वळवली व भाविकांची वाहने गावा बाहेर आडवुन वाहनतळावर वळवल्याने गावात वाहतूक कोंडीचा त्रास जाणवला नाही यावेळी तुळजापरचे आमदार राणाजगजितसिंह पाटील कळंब धाराशिव तालुक्याचे आमदार कैलास दादा पाटील यांनी पालखीचे दर्शन घेतले हि यात्रा सतरा तारखेपर्यंत चालणार आहे.

**जयभीम महोत्सवात १८**

रोहीदास मस्के,प्रतिभा रंजीत वाघमारे,पंचशिला भास्कर सरपते,शीतल बाबासाहेब पालके व शेकडो विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला होता. १८ तास वाचनासाठी बसलेल्या विद्यार्थ्यांना जयंती उत्सव समितीचे प्रा.अशोक गायकवाड,सुमेध जोगदंड,स्वप्नील चोपडे यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक देण्यात आले.

**कापरेवाडीत रस्त्याची केली**

नागरिकांना पाणी पिण्यासाठी सुध्दा नाही त्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत तसेच गावांमध्ये संपूर्ण रोड खोदुन गुत्तेदार मोकळा झाला आहे तरी सीईओ साहेब गुत्तेदारावर कार्यवाही करणार का तुम्ही खोदलेले रोड व्यवस्थित करणार असा प्रश्न नागरिकांना पडला आहे नागरिकांन मध्ये चर्चा सत्र सुरू झाले आहे अशी बातमी दैनिक पुण्यभूमीला प्रसिद्ध होताच रत्यांची सुधारणा करण्यात आली आहे.

**आमचा आजही सर्वांगिण**

लिहून हजारो वर्षांची सनातनी व्यवस्था लथाडून आपल्याला माणूस म्हणून जगण्याचा हक्क मिळवून दिला. मात्र आज त्या हक्कांवर विविध मार्गाने संकटे आणली जात आहेत. त्यामुळे आंबेडकरी जनतेने सावध रहायला हवे.असे परखड मत धम्मसंगिनी रमागोरख यांनी व्यक्त केले. या व्याख्यान मालेच्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक माया दिवाण यांनी केले. सूत्रसंचालन शैलजा चिलवंत तर आभार प्रदर्शन मायाताई चोपडे–सोनवणे यांनी मानले.दरम्यान जयभीम महोत्सव यशस्वीपणे पार पाडण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने मोलाचे परिश्रम घेतले.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स ॲन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi news paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# असाधारण जोडी



ओंजळ

पल्लवी अष्टेकर



महात्मा जोतिबा फुले यांचा जन्म १८२७ साली झाला. त्यांच्या वडिलांचे नाव गोविंद व आईचे नाव चिमणाबाई असे होते. पण जोतिबांची आई ते अवघे नऊ महिन्यांचे असताना मरण पावली; परंतु जोतिबांचा सांभाळ त्यांची आत्या म्हणजे गोविंदरावांची मावस बहीण सगुणा हिने केला. जोतिबा तिच्यावर मातेप्रमाणे प्रेम करत. त्याकाळात शिक्षण सार्वत्रिक नव्हते. शाळा नव्हत्या. पण ख्रिश्चन धर्मप्रचारक काही शाळा चालवित. वयाच्या ६ व्या वर्षी जोतिबांना शाळेत घालण्यात आले.

शाळेत जोतिबा एक बुद्धिमान, अभ्यासू मुलगा म्हणून चमकले. प्राथमिक शिक्षण संपल्यावर ते आपल्या वडिलांचा व्यवसाय पाहू लागले. शेतात जाऊन कष्ट करू लागले. जोतिबांच्या बागेजवळ गफार-बेगुनशीव-मेजर लेजिंट राहत. त्यांना जोतिबांच्या बुद्धिमत्तेची कल्पना होती, म्हणून त्यांनी आग्रह करून जोतिबांच्या वडिलांना इंग्रजी शाळेत आपल्या मुलाला पाठविण्याचा सल्ला दिला. वडिलांनी जोतिबाला स्कॉटिश मिशनच्या शाळेत इंग्रजी शिकण्यास पाठविले. दलित, गरीब, अस्पृश्य हिंदू बांधवांना, विशेषतः स्त्रियांवर होत असलेल्या अन्यायाविरुद्ध लढा देण्याचे जोतिबांचे ध्येय निश्चित झाले.



सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यातील खंडूजी पाटील (नेवसे) यांच्या सावित्री या मुलीशी जोतिबांनी विवाह केला. सावित्री दिसायला सुंदर, बुद्धिमान व सुदृढ होत्या. लग्न झाले तेव्हा अंगठेबहाद्दर असणाऱ्या या महत्त्वाकांक्षी स्त्रीने स्वतः शिक्षण घेऊन १८४८ साली बुधवार पेठेत चिपळूणकर वाड्यात पहिली मुलींची शाळा उघडली. तेथे प्रथम जोतिबा शिकवित, पण नंतर ते काम सावित्रीबाईंनी स्वतःच्या अंगावर घेतले. जातीच्या लोकांनी चिथवल्यामुळे गोविंदरावांनी आपल्या मुलाला व सुनेला घराबाहेर काढले. निर्वाहासाठी जोतिबांनी रस्त्यांची, पुलांची कंत्राटी कामे घेण्याचे सुरू केले. शाळेतील मुलींची संख्या वाढत गेली तेव्हा आणखी दोन-तीन शाळा उघडण्यात आल्या. चार भिंतींच्या आतील शालेय शिक्षणासमवेत आणखी जास्तीचे कार्य स्त्रियांसाठी करणे जरूरीचे असल्याचे त्यांच्या लक्षात आले.

१८५२ मध्ये पुणे शहरातील भोकरवाडी गावात अस्पृश्यांसाठी त्यांनी मुलांची शाळा उघडली. त्यासाठी मुलांची मने वळवून त्यांना स्वच्छता व टापटीपपणा शिकवावा लागला. शाळेत अनेक जाती-जमातींची मुले शिकू लागली. तसेच त्या सुमारास त्यांनी 'महिला सेवा मंडळाची' स्थापना केली. जोतिबांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन झालेल्या या संस्थेच्या अध्यक्षा मिसेस इ. सी. जोन्स या होत्या. स्त्रियांच्या प्रगतीसाठी झटणारी ही पहिली संस्था होय. अखिल भारतीय पातळीवर महिलांसाठी कार्यरत असणाऱ्या या संस्थेच्या त्या सचिव होत्या.

समाजक्रांतीची सुरुवात एका स्त्रीने करावी म्हणजे एक धाडसच होते. अध्यापन क्षेत्रातील त्यांचे पहिले पाऊल म्हणजे समाजकार्याचा शुभारंभच होय. यासाठी कितीही हेटाळणी झाली तरी त्या डगमगल्या नाहीत. उलट त्या म्हणत, "माझ्या लहान-थोर बंधूंनो, मी आपल्या धाकट्या भगिनींना शिकवण्याचे कार्य करीत आहे. मला उत्तेजन देण्यासाठी आपण माझ्यावर शेण अगर खडे फेकत नसून ही फुले उधळीत आहात. तुमचे हे कृत्य मला असे सुचवित आहे की, मी नेहमी अशीच आपल्या भगिनींची सेवा करीत जावे. ईश्वर तुम्हाला सुखी ठेवो."

१८५३ मध्ये त्यांनी अविवाहित व परित्यक्ता माता झालेल्या बायकांसाठी आपल्या घरात अनाथाश्रम काढला. या तरुणींना सावित्रीबाई फुले यांनी मायेच्या ममतेने वाढविले. अशा निराश्रित स्त्रिया व त्यांची अनौरस मुले त्यांनी सांभाळली. सावित्रीबाई फुले यांच्यात एक कवियित्रीचे गुणही दिसून येतात. अभ्यासकांनी त्यांच्या कवितांची वर्गवारी साधारणपणे निसर्ग विषयक, सामाजिक, प्रार्थनापर, आत्मपर, काव्यविषयक, बोधपर, इतिहासविषयक आणि स्फुट कविता अशी केली आहे. त्यांच्या इतिहासविषयक कवितांमध्ये छत्रपती ताराबाई यांच्या शौर्याचा उल्लेख आहे. त्यांच्या एका कवितेची झलक-

**ही एकच शूर रणगाजी**
**छत्रपती ताराबाई,**
**शिवधनू प्रतापी माझी वीरांची रणदेवाई.**
**जयभवानी जयजयकार जय ताराराणी**
**ललकार, तिज करी मी नमस्कार,**
**शूर देवीचा जयजयकार.**

त्यांच्या कवितांमधून काव्य आशय, वैचारिक संपन्नता यांचे दर्शन घडते. जोतिबा फुले यांनी १८७३ मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सावकारशाही, नोकरशाही यातून समाजाला मुक्त करण्यासाठी त्यांनी हे पाऊल उचलले. जोतिबांच्या जीवनाचे एकच सुत्र होते. ते म्हणतात,

**मानवासाठी बहुधर्म कसे,**
**झाला का हो पिसे-ज्योति म्हणे.**
**मानवाचे धर्म नसावे अनेक,**
**निर्मिक (ईश्वर) तो एक - ज्योति म्हणे.**

काशीबाई नावाच्या विधवेला एका तरुणाने फसविले. ती गरोदर राहिली, तेव्हा लोकनिंदेला घाबरून ती मुठा नदीच्या पाण्यात जीव देण्यास निघाली, तेव्हा जोतिबांनी तिला पाहून जीव देण्यापासून परावृत्त केले. तिला प्रेमाने आधार देऊन घरी आणले. सावित्रीबाईंनी तिला पोटच्या मुलीप्रमाणे सांभाळले. तिला मुलगा झाला, त्याचे नाव त्यांनी यशवंत ठेवले. स्वतःचा मुलगा म्हणून वाढविले व डॉक्टर केले. त्याचा विवाह लावून दिला. म्हातारपणी जोतिबा पती-पत्नीचा सांभाळ याच मुलाने केला. १० मार्च १८९७ रोजी जोतिबांनी इहलोकीची यात्रा संपविली. त्यांच्या निधनाने 'आपला एक मोठा आधार नाहीसा झाल्याने लोकांना परमावधीचे दुःखं झाले. सावित्रीबाईंनी जन्मभर जोतिबांना साथ दिली. पतीला वैचारिक व प्रत्यक्ष कार्यात सहकार्य करून अडचणी, छळ व टीका सहन करून जोतिबांचे कार्य फुलविले.

सावित्रीबाईंनी श्रमकरी श्रोत्यांना नजरेसमोर ठेवून भाषणे केली. या भाषणांमधून त्यांनी समाजमनाची जडण-घडण करण्याचा प्रयत्न केला. ही भाषणे जोतिबा निवर्तल्यानंतरची असली तरी, त्यांच्या पूर्व आयुष्यातील वैचारिक अनुभवांच्या बैठकीवर पक्की आहे. सावित्रीबाईंची भाषणे सदाचरण, विद्यादान, उद्योग, व्यसन आणि कर्ज यावर आहेत.

१. सदाचरण - परोपकार, सत्कार्य इ. चांगल्या वागणुकीने मनुष्यास सुख मिळते. या सदाचरणावर निष्ठा ठेवण्याचा त्यांचा अधिकार आहे. सदाचरणी व्यक्तीचे सदाचरण आत्मसात करण्याची सूचना त्यांनी कुटुंबे सुखी व संपन्न होण्यासाठी केली आहे.

२. विद्यादान - अविद्यतेतून बाहेर पडण्यासाठी त्यांनी दलित, बहुजनांना व सरकारला काही सूचना दिल्या.

३. मानव कल्याणासाठी उद्योगांची नितांत आवश्यकता आहे. उद्योग हा मानवाचा मित्र असून, आळस हा माणसाचा शत्रू आहे.

४. व्यसन - माणसाचे जीवन धुळीस मिळवण्यास व्यसने कारणीभूत असतात. व्यसनाचे दुष्परिणामही त्यांनी स्पष्ट केले आहेत.

५. कर्ज - शहाण्याने कर्ज काढू नये ही शिकवण सावित्रीबाई देतात. १८९७ मध्ये प्लेगची साथ आल्यावर त्यांनी लागण झालेल्या लोकांसाठी काम केले. या प्रक्रियेत सावित्रीबाई फुले यांना देखील प्लेगची लागण झाली. १० मार्च १८९७ रोजी त्यांचा मृत्यू झाला. अशा या असाधारण जोडीला कोटी-कोटी प्रणाम.

# "प्यार का जमाना आया दूर हुए गम..."

नॉस्टॅल्जिया

श्रीनिवास बेलसरे



'राम और शाम' (१९६७) हा दिलीपकुमारचा पहिला डबलरोल. त्यानंतर त्याने 'बैराग'मध्ये (१९७६) ३ भूमिका केल्या होत्या आणि त्याच्या शेवटच्या 'किला' (१९९८)मध्ये पुन्हा डबलरोल निभावला होता. 'राम और शाम' हा १९६४ च्या 'रामुडू भिमुडू' या तेलुगू सिनेमाचा रिमेक! दोन्हीचे दिग्दर्शक होते तापी चाणक्य. सिनेमाने जबरदस्त धंदा केला. त्यावर्षी सर्वाधिक उत्पन्न देणाऱ्या सिनेमांच्या यादीत त्याचा क्रमांक मनोजकुमारच्या 'उपकार' खालोखाल दुसरा होता.

दिलीपला या सिनेमाने सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचे फिल्मफेयर मिळवून दिले. सिनेमात त्याच्याबरोबर वहिदा रेहमान, मुमताज, प्राण, निरूपा रॉय, नझीर हुसैन, बेबी फरीदा, मुक्री, कन्हैयालाल आणि पुढे 'शोले'त 'बसंतीकी मौसी' म्हणून गाजलेल्या लीला मिश्रा



होत्या! कथानक अगदी साधेसरळ होते. राम (दिलीपकुमार-१) हा एका श्रीमंत घरातला अतिशय सज्जन युवक. घरी त्याच्याबरोबर बहीण सुलक्षणा (निरुपमा रॉय) पुतणी कुकू (बेबी फरीदा) आणि घरजावई मेहुणे गजेंद्र (प्राण) राहत असतात. त्याच्या गरीब स्वभावामुळे घरात फक्त प्राणची सत्ता चालते. तो रामला अनेकदा चाबकाने फोडून काढत असतो. यावेळी प्राण आणि दिलीपमध्ये अभिनयाची जणू स्पर्धा लागली होती. प्राणने खलनायकाचा क्रूरपणा आणि दिलीपने त्याचा भित्रेपणा इतका बेमालूनपणे वठवला होता की, आपल्याला पहिल्या काही मिनिटांतच प्राणचा संताप येऊ लागतो! गरीब बिचाऱ्या दिलीपला मदत करावीशी वाटू लागते!

पुढे सिनेसृष्टीच्या अलिखित नियमाप्रमाणे लहानपणीच हरवलेला दिलीपचा दुसरा रोल - शाम हा जुळा भाऊ कथानकात अचानक प्रकट होतो. तो दिलीप-१च्या अगदी उलटा स्वभाव असलेला, आत्मविश्वासू, धाडसी, उमदा युवक असतो. विलक्षण फिल्मी योगायोगाने दोघेही एकमेकांच्या घरात जबरदस्तीने नेले जातात आणि सिनेमाचे खरे नाट्य सुरू होते. 'शाम'ला राम समजणाऱ्या प्राणचा आक्रमक प्रतिकार करून शाम त्याला चांगलाच सरळ करतो. शेवटी दोन्ही दिलीपांचे अनुक्रमे वहिदा रेहमान आणि मुमताजशी लग्न होते आणि कथेची सुखांतिका होते.

सिनेमाला अतिशय मधुर संगीत होते नौशाद यांचे, तर एकापेक्षा एक गाणी होती शकील बदायुनीसाहेबांची. त्यात 'बालम तेरे प्यारकी थंडी आग मे जलते जलते, मैं तो हार गयी रे' हे गोड दिसणाऱ्या मुमताजसाठी तितक्याच गोड आवाजाच्या आशाताईंनी गायले होते! त्यांच्या आवाजाला काय म्हणावे तेच कळत नाही. मादक, खोडकर, नटखट, गोड अशी सगळी विशेषणे आशाताई हक्काने बळकावतात.



त्याशिवाय लतादीदीने रफीसाहेबांबरोबर गायलेले 'मैं हुं साकी, तू हैं शराबी शराबी' हे त्याच्या ठेक्याने चांगलेच लोकप्रिय झाले होते. रफीसाहेबांचे 'आज की रात मेरे दिल की सलामी लेले, दिल की सलामी लेले, कल तेरी बज्मसे दिवाना चला जायेगा, शम्मा रह जायेगी परवाना चला जायेगा' हे गाणे दिलीप आणि वहिदाच्या प्रेमात आलेल्या दुराव्यामुळे शेवटचा निरोप ठरणारे वाटून अस्वस्थ करून टाकते.

रफीसाहेबांनी गायलेले असेच एक गाणे १९६८साली बिनाकाच्या वार्षिक कार्यक्रमात ७ व्या क्रमांकावर वाजले होते. शामच्या येण्याने घरातले वातावरण बदलले आहे. आधीचे दहशतीचे, अन्याय-अत्याचाराचे वातावरण जाऊन घर हसतेखेळते झाले आहे. हा प्रसंग शकीलजींनी या गाण्यात छान रंगवला होता. गाण्याचे शब्द होते -

**'आयी हैं बहारे मिटे जुल्मो सितम.**
**प्यार का जमाना आया दूर हुए गम.**
**रामकी लीला रंग लायी...**
**आ हा हा**
**शामने बंसी बजायी...'**

तसेही पाहिले तर खुद्द श्रीरामाचे जीवनही सहनशीलतेचा नमुनाच होते. दिग्दर्शकाने म्हणूनच कदाचित संयमी सहनशील दिलीपला राम हे नाव दिले होते आणि अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या आक्रमक भूमिकेला शाम हे नाव दिले होते. शामच्या आगमनाने घराला जणू नवजीवन प्राप्त झाले आहे. घरातील सर्वच सदस्यांच्या चेहऱ्यावरील कायमचा तणाव नाहीसा होऊन तिथे एक मंद स्मित तरळते आहे. शाम त्याची छोटी भाची कुकुला घेऊन नाचतउडत हे गाणे गातो आहे-

**'चमका है इन्साफ का सूरज,**
**फैला है उजाला...**
**नयी उमंगें संग लाएगा,**
**हर दिन आनेवाला.**
**हो हो मुन्ना गीत सुनाएगा,**
**तुन्ना ढोल बजायेगा,**
**मुन्ना गीत सुनाएगा.'**
**तुन्ना ढोल बजायेगा,**
**संग संग मेरी छोटी मुन्नी,**
**नाचेगी छम छम.**

**आयी हैं बहारे...**

शकीलजींनी जणू त्या घरातील भविष्यकाळच्या वातावरणाचे चित्रच गाण्यात केले होते. आधी प्राण आणि त्याची कुटील टीम सर्वांना छळत असते. वाटेल तशी कामे करून घेणे, धड जेवायलाही न देणे, वर मारहाण, कधीकधी तर चाबकाने मारणे हे सुरु असते. आता मी तसे काही घडू देणार नाही अशी ग्वाहीच शाम या गाण्यातून घरातील सर्वांना देतो आहे -



**'अब न होंगे मजबूरी के इस घर में अफसाने,**
**प्यार के रंग में रंग जायेंगे सब अपने-बेगाने.**
**सबके दिन फिर जायेंगे, मंजिल अपनी पाएंगे.**
**जीवन के तराने मिल के गाएँगे हरदम.**
**हो, आयी हैं बहारें... मिटे जुल्मो सितम**
**प्यार का जमाना आया दूर हुए गम...**

घराचा खरा मालक असलेल्या रामला गजेन्द्रने (प्राण) एखाद्या घरगड्यासारखे करून टाकलेले असते. त्याच्या मनात टोकाची भीती आणि न्यूनगंड निर्माण करून ठेवल्याने तो प्रत्येक श्वाससुद्धा दबून घाबरत घाबरत घेत असतो. त्यात त्याच्यासारख्या दिसणाऱ्या शामने आणलेली क्रांती पाहून घरातले सगळे सदस्य हरखून गेलेले असतात.

**'अब न कोई भूखा होगा और न कोई प्यासा,**
**अब न कोई नौकर होगा और न कोई आका.**
**अपने घर के राजा तुम, छेड़ो मन का बाजा तुम.**
**आ जायेगी सुरमें देखो जीवन की सरगम.**
**हो आयी हैं बहारे मिटे जुल्मो सितम.**
**प्यार का जमाना आया दूर हुए गम.**
**राम की लीला रंग लायी आ हा हा,**
**शामने बंसी बजायी आ हा हा हा.'**

त्याकाळी सिनेमातून दिसणारा झगमगाट, सामान्य जीवनात अशक्य वाटणारे नाट्यमय प्रसंग हे सगळे अद्भुत अनुभवात मोडणारे होते लोकही भावनाशील, साधेसरळ होते, सत्याचा विजय आणि असत्याचा पराभव पाहणे हीच त्यांची आवड होती. प्रचंड हिंसा, बेछूट वर्तन, उघडावाघडा लज्जाहीन शृंगार ही त्यांच्या नेत्रेंद्रियांची गरज करण्यात मनोरंजनविश्वाला आजच्यासारखे यश आलेले नव्हते! त्यामुळे असे मनाला सुख देणारे, सत्याचा विजय दाखवणारे, आल्हाददायक सिनेमा चालत असत. कधीकधी त्या सुखद काळात सफर करावीशी वाटली, तर ही गाणी एक भक्कम पूल म्हणून काम करू शकतात. ऐकावीत अशी गाणी कधी!

# रांगोळी : एक पारंपरिक भारतीय कला



विशेष

लता गुठे



अगदी मला समजायला लागल्यापासून रांगोळीचं विशेष आकर्षण आहे. आमच्या वाड्याच्या समोर मोठे अंगण होते. त्या अंगणामध्ये शेणाचा सडा टाकून सणावाराला किंवा घरात काही शुभ कार्य असेल त्या वेळेला घरातील मोठ्या स्त्रिया रांगोळी काढून त्यावर हळदीकुंकू टाकत असत.

८० च्या दशकामध्ये त्या वेळेला रांगोळीत रंग भरण्याची फारशी पद्धत नव्हती; परंतु ठिपके काढून चिमटीतल्या रांगोळीने बारीक रेषा काढून ते ठिपके चांदण्याची कला मात्र पिढ्यानपिढ्यांतील महिलांना अवगत होती. आम्ही शेतातून शिरगुळे वेचून आणून ते बारीक वाटून व शिरगाव करून त्याची रांगोळी डब्यात भरून ठेवायचे हे मला आजही आठवते.

दिवाळी, दसऱ्यामध्ये तर दारादारांत मंदिरांसमोर खूप सुरेख रांगोळी काढलेल्या असायच्या. चला तर मग या पाठीमागचे सांस्कृतिक धार्मिक रांगोळीचे महत्त्व जाणून घेऊया...

**रांगोळीचे धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व :**

रांगोळी दिसायला सुंदर असल्यामुळे तिच्याकडे पाहून मन प्रसन्न तर होतेच; परंतु आजूबाजूचा परिसरही सुंदर दिसतो आणि एक सकारात्मक ऊर्जा निर्माण करते. म्हणून कदाचित हिंदू धर्मामध्ये रांगोळीचे अनन्यसाधारण महत्त्व असावे. कोणत्याही शुभकार्यामध्ये शुभ शकून मानल्या गेलेल्या काही गोष्टींचा वापर करतात. त्यामध्ये रांगोळी असतेच. यामागे धार्मिक पवित्रता, सकारात्मक ऊर्जा आणि देवतांचे स्वागत करण्याचा भाव दडलेला असतो. हिंदू धर्मानुसार, रांगोळी घरात शुभ शकून निर्माण करते असे म्हणतात. विशेषतः लक्ष्मीपूजेच्या दिवशी घराच्या प्रवेशद्वारावर रांगोळी काढण्याचा संकेत आहे. असे मानले जाते की, लक्ष्मीदेवी स्वच्छता आणि सौंदर्याची उपासक आहे, म्हणून अंगणात लक्ष्मीचे स्वागत करण्यासाठी रांगोळी काढतात.

तसेच सूर्य उपासनेतही रांगोळीचे विशेष महत्त्व आहे. दारामध्ये स्वस्तिक काढून सूर्याच्या आकृतीची रांगोळी रेखाटली जाते. जिथे रांगोळी उपलब्ध नसते तिथे अति ग्रामीण भागात किंवा आदिवासी खेड्यांमध्ये तांदळाच्या पिठाच्या रांगोळ्या काढतात, तर काही ठिकाणी फुलांच्या रांगोळ्या काढल्या जातात.

बदलत्या काळाबरोबर रांगोळी या कलेमध्येही प्रचंड प्रमाणात विविधता आलेली आहे. आपण पाहतो आहे की, रांगोळीमध्ये सुरेख पोट्रेट बनवतात. त्याबरोबरच पाण्यावरच्याही रांगोळ्या काढल्या जातात. रांगोळी स्पर्धेमध्ये रांगोळीचे अनेक प्रकार पाहायला मिळतात. अगदी पानाफुलांच्या रांगोळीपासून ते संस्कारभारती मोठ्या रांगोळीपर्यंत.

मुळातच स्त्रियांमध्ये सृजनशीलता, सर्जनशीलता हे गुण असल्यामुळे तिला सौंदर्याची आवड असल्यामुळे अशा विविध कलांमधून पारंपरिक स्त्रीने आपली आवड जोपासली. भारतीय संस्कृती ही विविधतेने नटलेली, समृद्ध परंपरांनी सजलेली आहे. यामध्ये आचार विचारांचेही महत्त्व आहे. भारतामध्ये अनेक जाती धर्माचे लोक राहतात. प्रत्येकाची परंपरा, संस्कृती जरी वेगळी असली तरी या भिन्नतेत एकतेचा नेहमी अनुभव येतो.

विविध प्रांतांमध्ये रांगोळीच्या भिन्न शैली आणि पद्धती प्रचलित आहेत. महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, तामिळनाडू, आंध्र प्रदेश, ओडिशा आणि उत्तर भारतातील काही भागांमध्येही ही कला वेगवेगळ्या नावांनी आणि रूपांत पाहायला मिळते.

**मला उमगलेली रांगोळीची व्याख्या:**

'रांगोळी' हा शब्द रंग आणि आवळी म्हणजे ओळ किंवा रेषा काढणे. या शब्दांपासून बनली रांगोळी. म्हणजेच रंगांनी आकृती तयार करणे, रंगांच्या सहाय्याने सजवलेली चित्रकला. काही प्रांतांत रांगोळीला कोलाम, मुंगू, मंडणा, अल्पना अशी नावे आहेत.

भारतामध्ये हजारो वर्षांपूर्वीपासून अनेक कला अवगत आहेत. संगीत, नृत्य तसेच अनेक लोककला, वास्तुशास्त्र, नाट्यशास्त्र अशा ग्रंथांमध्येही रांगोळीचा उल्लेख सापडतो. पुरातन काळात, देवी-देवतांचे स्वागत करण्यासाठी किंवा पूजेसाठी जागा पवित्र करण्यासाठी रांगोळी काढली जात असे. ऋषी-मुनींनी वापरलेल्या यज्ञकुंडाभोवती रांगोळी काढण्याची प्रथा होती. भारतीय पुराणकथांनुसार, ब्रह्मदेवाने सृष्टीची निर्मिती करताना रंगांची निर्मिती केली आणि त्यातून 'रंगावली' म्हणजेच रांगोळी जन्मली, अशी एक आख्यायिका सांगितली जाते. अजंठा किंवा वेरूळची लेणी जर पाहिली, तर छतांवर, भिंतींवर अशा रांगोळी विविध रंगांमध्ये कोरलेल्या आढळतात. त्यामध्ये विशिष्ट प्रकारच्या प्रतिकात्मक आकृत्या पाहायला मिळतात. कमळ, शंख, स्वस्तिक, ॐ, अश्वत्थ वृक्ष इत्यादींमधून आध्यात्मिक ऊर्जा निर्माण होते, असा विश्वास आहे.

रांगोळी ही एक प्रकारची नकारात्मक शक्ती दूर ठेवण्याची पद्धत देखील मानली जाते. रांगोळीचे आणि महिलांचे नाते हे अतिशय जवळचे आहे. रांगोळी ही महिलांच्या सृजनशक्तीचे आणि कलात्मकतेचे प्रतिक आहे. यामध्ये स्त्रियांची कल्पकता प्रतिभा शक्ती दिसून येते. स्त्रियांनी घर सांभाळण्याच्या बरोबरीने घराच्या उंबरठ्यावर दररोज रांगोळीने सौंदर्य वाढवणे, हे त्यांच्या जीवनशैलीचा भाग आहे. या कलामध्ये त्यांची शिस्त, संयम, बारीक निरीक्षणशक्ती आणि सौंदर्यदृष्टी हे गुणनिदर्शनास येतात. वरील विवेचनावरून आपल्या हे लक्षात येईल की, रांगोळी ही एक फक्त कलानुसार ती भारतीय संस्कृतीची एक ओळख आहे.

अनेक गोष्टींचे रांगोळीला संदर्भ असल्यामुळे रांगोळीची ही कला दिवसेंदिवस वृद्धिंगत होत चालली आहे. लहान थोरांपासून सर्वांनाच रांगोळीचे आकर्षण प्रकर्षाने जाणवते. पुढच्या वेळेला आणखी भारतीय संस्कृतीचा एखादा नमुना घेऊन आपल्याला भेटायला येईल.

# नारदांचे पूर्वचरित्र

महाभारतातील मोतीकण

भालचंद्र ठोंबरे



प्रत्येक युगाच्या शेवटी त्या कालावधीत समाजात धार्मिक शक्ती क्षीण होत जातात व समाज श्रद्धाहीन होतो. आयुष्यमानही कमी होते. हे पाहून सर्व जगाचे हित व्हावे असे श्री व्यासांना वाटले. तसेच अग्निष्टहोमादी वेदोक्त कार्याने लोकांचे हृ दय शुद्ध होते, म्हणून व्यासांनी वेदांचे ऋग्वेद, अथर्वेद, सामवेद व यजुर्वेद असे चार भाग केले. सर्वांना वेद यावेत म्हणून त्याचे अनेक भाग पाडले. सर्वसामान्य जनांच्या वागणुकीतून शास्त्राच्या आचरणात चुका होतील म्हणून त्यांचेही भले व्हावे म्हणून त्यांच्यासाठी महाभारताच्या निमित्ताने वेदांचाही अर्थ विषद केला; परंतु एवढे करूनही व्यासांचे समाधान झाले नाही.

अशा विचारात व्यास असताना त्या ठिकाणी नारदांचे आगमन झाले. ब्रह्मर्षी नारदांना पाहून व्यासांनी नारदांना आपल्या अशांत मनाला शांत करण्याचा उपाय विचारला. तसेच कालाच्या अंती सगळ्या स्मृती नष्ट होत असतांनाही आपल्या सर्व स्मृती कशा कायम राहिल्या ह्याची जिज्ञासापूर्ण विचारणा केली. तेव्हा नारदांनी अशांत मन शांत करण्यासाठी तसेच जगत कल्याणासाठी व सर्व जीवमात्रांना बंद मुक्त करण्यासाठी श्री व्यासांना भगवंताच्या लिलेचे वर्णन करण्यास सांगितले. तसेच नारदाने आपले पूर्वचरित्र कथन केले.

**नारदाचे पूर्वचरित्र :**

या कल्पा पूर्वीच्या जन्मात नारद एका ब्राह्मणाच्या दासीचा मुलगा होता. एके दिवशी चतुर्मासात त्यांच्याकडे काही योगीजन आले. नारदांनी त्यांची मनापासून सेवा केली. तसेच त्यांच्या परवानगीने त्यांच्या पात्रातील उष्टे अन्न नारद खात असत. योग्यांच्या सानिध्यात दररोज भगवंताच्या लीलेच्या कथा ऐकल्याने नारदांना भगवंताविषयी प्रेम वाटू लागले. त्यांच्यातील रजोगुण, तमोगुण नाहीसे होऊन त्यांना भजन पूजनात गोडी वाटू लागली. त्यांच्या हृदयात भगवंताविषयी प्रीती व भक्ती उदय पावू लागली.

एके दिवशी नारदांची माता रात्रीच्या वेळी गाईचे दोहन करण्यासाठी जात असताना तिचा पाय सापावर पडला व सर्पदंश होऊन ती मरण पावली. ही भगवंताची इच्छा मानून नारद घराबाहेर पडून, उत्तरेकडे गेले. त्यांना मार्गात अनेक धनसंपन्न देश, भटक्या वस्त्या, विचित्र पर्वत, नद्या, सरोवरे, लागली. एका ठिकाणी नारद नदीत स्नान करून वृक्षाखाली ध्यानस्त बसले असता व भक्तीपूर्वक अंतकरणाने भगवंताचे ध्यान करू लागताच योग्यांनी वर्णन केल्याप्रमाणे भगवंताचे रूप यांच्या हृदयात प्रकट होऊ लागले. सर्व प्रकारच्या दुःखाचा नाश करणारे ते भगवंताचे रूप पाहतांना नारद आनंद सागरात बुडून गेले असता अचानकपणे ते रूप नाहीसे झाले.

त्यामुळे अस्वस्थ झालेले नारद त्या रूपाच्या दर्शनासाठी व्याकुळ झाले. आपले मन हृदयात स्थिर करून नारद पुन्हा ते रूप पाहण्याचा प्रयत्न करू लागले. मात्र तोच त्यांना एक धीर गंभीर आवाज ऐकू आला. हे बालक, तू माझे रूप या जीवनात पुन्हा पाहू शकणार नाही. तुझ्या मनात मला प्राप्त करण्याची इच्छा निर्माण व्हावी या हेतूने मी माझे रूप क्षणभर तुला दाखविले. ज्यांच्या मनातील वासना पूर्णपणे नष्ट झाल्या अशानांच माझे दर्शन होते. तू आता हे शरीर त्यागून माझा पार्षद होशील. मला प्राप्त करण्याच्या दृढ निश्चयामुळे या सृष्टीचा प्रलय झाल्यावरही तुझ्या स्मृती कायम राहतील. तेव्हापासून भगवंताचे नाम कीर्तन करीत त्यांचे स्मरण नारद करू लागले. योग्य वेळी नारदांचा मृत्यू झाला. कल्पाच्या शेवटी जेव्हा सर्व सृष्टी स्वतःमध्ये विलीन करून ब्रह्मदेव प्रलयाकालीन समुद्रात शयन करणाऱ्या विष्णूंच्या हृदयात शिरण्याचे ठरविले तेव्हा मीही त्यांच्या श्वासाबरोबर त्यांच्या शरीरात प्रवेश केला.

एक हजार चतुर्युगी संपल्यावर जेव्हा ब्रह्मदेव जागे होऊन त्यांच्यात सृष्टी निर्मितीची इच्छा निर्माण झाली, तेव्हा त्यांच्या इंद्रियातून मरीची वगैरे ऋषींसोबत मीही बाहेर पडलो. तेव्हापासून मी तीनही लोकात निर्धास्तपणे भ्रमण करीत असतो, भगवंत भजन त्यांच्या जीवनात अखंडपणे सुरू असते. जेव्हा मी त्याच्या लिलांचे वर्णन करतो तेव्हा ते माझ्या हृदयात येऊन मला दर्शन देतात.

ज्यांचे चित्त नेहमी विषय भोगाच्या वासनेने आतुर असते त्यांच्या मोक्षासाठी भगवंताच्या लीलाचे वर्णन हे हा संसाररूपी सागर पार करण्याचे जहाज आहे. अशा प्रकारे आपल्या जन्म व साधनेचे रहस्य व्यासांना सांगून नारद विणा-वादन करीत प्रयाण करते झाले.



आजच्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार अत्यंत महत्त्वाचे ठरतात, कारण आजही जातीव्यवस्था, लिंगभेद, निरक्षरता आणि आर्थिक विषमता हे समाजाला भेडसावणारे मुख्य प्रश्न आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने लोकशाहीचे सामाजिकीकरण हा मुद्दाही विचारात घेण्यासारखा आहे.

# विचारांची पुंजी जपायला हवी...

**उर्मिला राजोपाध्ये**

१४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने पुण्यस्मरण करताना त्यांच्या विचार आणि आचारांची उजळणी होण्याची गरज प्रकर्षाने जाणवते. आज संविधानाविषयी बरेच बोलले जाते. अनेकजण संविधानाची प्रत हातात घेऊन राजकारणाचे डाव खेळतात. मात्र बाबासाहेबांचे पुण्यस्मरण करत त्यांनी दाखवलेल्या आदर्शांचा अवलंब करायला हवा. तरच देशाचे भविष्य उजळ आणि लोकशाही बुलंद राहू शकेल.

१४ एप्रिल हा बाबासाहेब डॉ. भीमराव आंबेडकर यांचा जयंती दिन. महान नेते असणाऱ्या बाबासाहेबांचे विचार आजही अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्यांनी आयुष्यभर दलित, मागास वर्ग, शोषित आणि पीडित लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी तसेच मुख्य प्रवाहात सामावून घेण्यासाठी संघर्ष केला. भारतीय संविधानाचे शिल्पकार म्हणून त्यांनी दिलेले ऐतिहासिक योगदानही महत्त्वपूर्ण आहे. अशा या सामाजिक न्याय, समानतेसाठी जीवनभर झटलेल्या महामानवाचे स्मरण नवीन पिढीपुढे आदर्श ठेवणारे आहे. आजच्या काळात त्यांचे विचार अत्यंत महत्त्वाचे ठरतात, कारण आजही जातीव्यवस्था, लिंगभेद, निरक्षरता आणि आर्थिक विषमता हे समाजाला भेडसावणारे मुख्य प्रश्न आहेत. त्यामुळेच यासंबंधी बाबासाहेबांनी केलेले मार्गदर्शन समाजाला प्रेरित करणारे ठरेल. उदाहरणार्थ, आजच्या काळात महिलांचे अधिकार, आर्थिकदृष्ट्या मागासवर्गाचे कल्याण आणि सर्व लोकांना समान संधी देणे यासाठी बाबासाहेबांच्या विचारांचा आधार घेणे गरजेचे ठरते. संविधानाने दिलेल्या अधिकारांचा फायदा घेत आजची तरुणाई प्रगती साधू शकते.

बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आणि कार्य प्रत्येकाच्या समान अधिकारांसाठी, शाश्वत विकासासाठी आणि समाजात योग्यतेच्या वागणुकीसाठी प्रोत्साहित करणारे आहेत. डॉ. आंबेडकर यांनी समाजातील जातीव्यवस्थेला विरोध केला आणि सर्व माणसांना समान अधिकार मिळावेत यासाठी काम केले. समानतेच्या आधारावर समाजाची उभारणी झाली तरच मानवतेला खरी दिशा मिळेल, असे ते म्हणत. बाबासाहेबांनी शिक्षणाला अत्यंत महत्त्व दिले. शिक्षण हेच माणसाच्या जीवनातील सर्वात महत्त्वाचे आयुध आहे, असे त्यांचे मत होते. त्यांनी दलित आणि मागासवर्गीय लोकांना शिक्षण घेण्याचे महत्त्व सांगितले. आजही त्यांचा हा विचार युवा पिढीला प्रेरित करणारा आहे. भारतीय संविधानाचे शिल्पकार असणाऱ्या बाबासाहेबांची भूमिका संविधानातील सर्व व्यक्तींसाठी समान अधिकार, धर्मनिरपेक्षता आणि व्यक्तिस्वातंत्र्यावर आधारित होती. हे विचार आजच्या भारतीय राजकारणासाठी तसेच न्यायव्यवस्थेत महत्त्वाचे आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर केवळ सामाजिक सुधारक नव्हते तर त्यांनी आर्थिक विषमतेवरही भाष्य केले. आर्थिक समानता हीच खऱ्या सामाजिक बदलाची गुरुकिल्ली आहे, असे त्यांचे मत होते. सध्या त्यांच्या या विचारांचा वापर आर्थिक धोरणे आणि शोषणविरोधातील लढ्यांमध्ये होतो. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू धर्मातील असमानता आणि शोषणाला विरोध करत बौद्ध धर्म स्वीकारला. त्यांनी धर्माच्या बाबतीत स्वतंत्रता, समानता, बंधुता ही तत्त्वे मार्गदर्शक म्हणून स्वीकारली. या विचारांमुळे लाखो लोकांनाही धर्मांतर करण्याची प्रेरणा मिळाली. डॉ. आंबेडकर यांनी महिलांच्या हक्कासाठीही लढा दिला. त्यांच्या कार्यामुळे महिलांना आरोग्य, शिक्षा आणि समान अधिकार मिळवण्यासाठी अधिक संधी प्राप्त झाल्या. प्रसिद्ध वकील असल्यामुळे ते कायम महिलांच्या हक्कांबाबत काम करत राहिले. डॉ. आंबेडकर हे राजकीय जागरूकतेचे प्रबल समर्थक होते. राजकारण हा जीवनाचा अविभाज्य भाग असल्याचे त्यांचे मत होते. त्यांच्या विचारांमुळेच आज दलित आणि मागासवर्गीय लोक राजकारणात सक्रिय होण्याचे प्रयत्न करताना दिसतात. या दृष्टीने त्यांचे विचार आजही प्रभावी ठरतात.

बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाबद्दल व्यक्त केलेले विचार आजही मोलाचे आहेत. ते म्हणत, वर्षातले चार महिने शेतकरी बेरोजगार असतो. हे लक्षात घेऊन शेतकऱ्यांसाठी पूरक उद्योग निर्माण होण्याची आवश्यकता आहे; परंतु बाबासाहेबांच्या या शिकवणीकडे तेव्हापासून आजतागायत म्हणावे तसे लक्ष देण्यात आले नाही. आजही अनेक तज्ज्ञ शेतीला पूरक उद्योग निर्माण करण्यावर भर द्यावा, असा आग्रह धरत आहेत. यावरून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दूरदृष्टीची कल्पना येते. सद्यस्थितीत सगळ्यांनी डॉ. आंबेडकरांचे सामाजिक न्यायाचे तत्त्व अंगीकारणे महत्त्वाचे ठरणार आहे. तरच सगळ्या समाजाला विकासाच्या समान संधी प्राप्त होतील आणि संपूर्ण समाजाची विकासाकडे वेगाने वाटचाल होऊ शकेल. त्यातून देशाच्या संपूर्ण विकासाचे स्वप्न पूर्ण होणे शक्य होईल.

आजही देशातली गरिबी, दारिद्र्य कमी करण्याचे आव्हान कायम आहे. अशा परिस्थितीत दारिद्र्य निर्मूलनाचा कालबद्ध कार्यक्रम हाती घेणे आणि त्याची काटेकोर अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. बेकारी, गरिबी याविरुद्धचा लढा हे देखील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीचे मुख्य सूत्र होते. इंदिरा गांधी यांनी पंतप्रधानपदी असताना देशातल्या बँकांचे राष्ट्रीयीकरण केले, सावकारी रद्द केली. सामान्य जनतेला याचा फायदा झाला. तसा काही कार्यक्रम आज राबवला जाणार का, हाही खरा प्रश्न आहे. आज बँकिंग व्यवस्थेचा लाभ केवळ धनदांडग्यांनाच होताना दिसत आहे. यातल्या काही मंडळींकडे असणारी कोट्यवधींची कर्ज थकबाकी विचार करायला लावणारी आहेत. काही कोटींची थकबाकी ठेवून, बँका डबघाईला आणून देशाबाहेर पळून गेलेले धनदांडगेही आपल्याला ज्ञात आहेत. त्यांच्या हस्तांतरणाचे प्रश्न किचकट आणि गुंतागुंतीच्या प्रक्रियेमुळे रखडलेले आहेत. हे सगळे लक्षात घेता सामान्यांना दिलासा देणारी बँकिंग व्यवस्था घडवण्याचे आव्हानही सत्ताधीशांपुढे आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तयार केलेल्या भारतीय संविधानाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी हे संविधान सादर करताना बाबासाहेब म्हणाले होते, 'आज आपण एका विसंगत जगात प्रवेश करत आहोत. एका बाजूला राजकीय समता प्रस्थापित होत असताना दुसरीकडे सामाजिक विषमता कायम आहे. अशा वेळी हे संविधान नीट राबवले गेले नाही तर घटनेचा डोलारा उद्ध्वस्त झाल्याशिवाय राहणार नाही.' या पार्श्वभूमीवर फुले, शाहू, आंबेडकर यांचा महाराष्ट्र म्हणताना दलितांवरील वाढते अन्याय-अत्याचार तसेच स्त्रियांवरील अत्याचाराच्या घटना व्यथित करणाऱ्या आहेत. आपला सामाजिक अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार हे सारे खपवून घेतले जाईल अशी प्रवृत्ती काही जणांमध्ये निर्माण होऊ लागली आहे. अशा परिस्थितीत लोकशाहीचे आणि संविधानाचे संरक्षण करण्याची जबाबदारी मोठी असून तसा विचार व्यापक प्रमाणावर व्यक्त होणे गरजेचे आहे. आज आर्थिक मंदी तसेच जागतिकीकरणाच्या नावाखाली शेतकरी आणि अन्य समाज उद्ध्वस्त होण्याची चिन्हे दिसत आहेत. या समस्येवर प्रगत म्हणवणारा महाराष्ट्र मात करू शकला नाही, तर ती शोकांतिका ठरेल. अशा वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची आणि मूल्यांची प्रकर्षाने आठवण होते. त्यांना अभिप्रेत असणारे सामाजिक परिवर्तन अजूनही झालेले नाही. त्यासाठी डॉ. आंबेडकरांच्या जयंतीच्या निमित्ताने जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन परिवर्तनाद्वारे समतेचा लढा लढण्याचा निर्धार व्यक्त व्हायला हवा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने लोकशाहीचे सामाजिकीकरण हा मुद्दाही विचारात घेण्यासारखा आहे. अलीकडे देशात जातीय, धार्मिक अस्मिता अधिक घट्ट होऊ लागल्या आहेत. एखाद्या गोष्टीचा फायदा आपल्या जातीबांधवांना वा धर्मबांधवांनाच व्हावा असा आग्रह धरला जात असून त्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. आरक्षणावरून वादळ उठत आहेत. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा प्रश्न गंभीर होत आहे. असंघटित कामगारांचा प्रश्न गंभीर आहे. यातून निर्माण होणारी आर्थिक विषमता चिंताजनक आहे. ती देशाच्या विकासातही अडसर ठरते. या सगळ्यांतून येणाऱ्या चिंतेच्या मुक्तीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे स्मरण आणि त्यांच्या उपदेशाचे अंगीकारण हा खात्रीचा उपाय आहे.

# कोलाज



## महानगरात जंगल फुलवणारी असीम

**काळोखाच्या गावी, प्रकाशाच्या वाटा**

**श्रद्धा बेलसरे खारकर**





सिमेंटचे जंगल बनलेले महानगर. जिथे माणसालाच राहायला जागा नाही अशा ठिकाणी हिरवेगार जंगल निर्माण करणे ही कल्पना अगदी अशक्य वाटते ना? पण ही किमया साधली आहे असीम गोकर्ण यांनी. 'फ्लॉरीकॅल्चर'मध्ये शिक्षण पूर्ण झाल्यावर तिने काही वेगळे करायचे ठरवले. पुण्यात शिकत असताना अनेक बंगल्यातल्या बागा बघितल्या. आपणही आता बागा तयार करू या आणि त्याही मोठ्या असे या महत्त्वाकांक्षी मुलीने ठरवले. त्याआधी शेती करायची तीही वेगळ्या पद्धतीने हे तिने ठरविले होतेच. सुदैवाने तिचा जोडीदार पंकजनेही तिला चांगली साथ दिली. वाडा तालुक्यात पेठ रांजणी येथे तिची वडिलोपार्जित थोडी शेती होती. पाच वर्षे त्या ठिकाणी राहून तिने अनेक प्रयोग केले. पण प्रकृतीच्या कारणावरून तिला मुंबईला यावे लागले.

तिने मुंबईत आल्यावर विविध वृत्तपत्रांत लिहायला सुरुवात केली. नव्या ओळखी-पाळखीतून तिला छोटी मोठी लँडस्केपिंगची कामे मिळू लागली. मुंबई महानगरपालिकेत एका वास्तुविशारदाबरोबर काम करताना तिच्या लक्षात आले की, सरकार सामाजिक वनीकरण आणि वनीकरणाच्या नावाने अनेक योजना राबवते. लाखो वृक्षांचे रोपण केले जाते पण शेवटी हाती काहीच लागत नाही. कारण या प्रकल्पासाठी केलेली झाडांची निवडच चुकीची होती. जिथे वनीकरण करायचे तिथली माती हवामान, पावसाचा अंदाज इत्यादी बघून झाडे लावावी लागतात. तसे होत नाहीच. उलट पुष्कळ वेळा सुबाभूळ, गुलमोहर अशी परदेशी पण भराभर वाढणारी झाडे लावली जातात. यांना फळे येत नाहीत. त्यावर पक्षी घरटे करत नाहीत. शिवाय अशा झाडांना काही वर्षे तरी नियमित पाणी द्यावेच लागते. हे नीट न झाल्याने ही झाडे फारशी वाढत, टिकत नाहीत.

असीमने मग अनेक मूलभूत बदल केले. आंबा, चिकू, काजू, नारळ, सुपारी, वड, जांभूळ ही झाडे लावली. त्यांना वर्षभरानंतर पाणी द्यावे लागत नाही. झाडे जमिनीतून स्वतः पाणी शोषून घेतात. लँडस्केपिंग करताना तिने महत्त्वाची गोष्ट केली की, त्या परिसरात फिरण्यासाठी सिमेंटचे रस्ते बांधणे टाळले. त्याऐवजी ज्या नैसर्गिक पायवाटा होत्या त्याच मातीच्याच उपयोगाने चांगल्या बांधून घेतल्या. रानात कधीही खाली पडलेला पालापाचोळा उचलायचा नसतो. तो तिथल्याच मातीत मुरू द्यायचा असतो. त्यातून खत तयार होते. छोटे-मोठे कीटक, किडेमुंग्या वस्तीला येतात आणि त्यांचे परस्परांवर अबलंबून असणारे सहजीवन सुरू होते. दोन झाडात थोडे अंतर ठेवल्यामुळे प्रत्येक झाडाला सूर्यप्रकाश मिळू शकतो आणि वाढ चांगली होते. एक दोन वर्षांतच झाडे फुलापानांनी बहरून येतात. पक्षी घरटी करू लागतात. पक्ष्यांच्या किलबिलाटाने जंगल नांदते होते. पुष्कळवेळा नवीन जंगल तयार करताना नर्सरीतून तयार झाडेही आणावी लागतात, त्याचाही ती छान उपयोग करते.

असीमला असे वाटते की, जंगलात एकाच प्रकारची, रंगाची, जातीची झाडी नसावी. त्यात रंगीबेरंगी फुले असावीत. म्हणून नवी मुंबई इथे तिने बकुळीचे वन केले. एका ठिकाणी बहावा लावलेला आहे, तर अनेक ठिकाणी रानजाई लावलेल्या आहेत. जारूळ, बुच, पारिजातक आणि गोकर्ण हे खासकरून अनेक ठिकाणी लावले आहेत. अशा जंगलात वेगवेगळ्या मोसमात वेगवेगळ्या रंगाची फुले बहरावीत असा तिचा कल्पक प्रयत्न असतो. कश्मीरमध्ये सिटीझन्स पार्क तयार करण्यासाठी तिला एक ग्लोबल टेंडर मिळाले! त्या प्रकल्पात नाविण्य आणताना तिथे नुसती झाडेच नाही तर काश्मीरची संस्कृती दिसली पाहिजे असा तिने आग्रह धरला. तिथे वाहणाऱ्या ओहळांना तिने नदीचे स्वरूप दिले. काश्मिरी लोक सकाळी उठल्यावर कहावा आणि रोट खातात. त्यासाठी तिने तेच पदार्थ मिळणारा एक कॅफेही तिथे सुरू केला. दुर्दैवाने तिचे हे काम काही पूर्ण होऊ शकले नाही.

आजतागायत मुंबई, नवी मुंबई, ठाणे, शिर्डी, पुणे, इत्यादी ठिकाणी असीमने छोटीमोठी जंगले तयार केली आहेत. इथे नक्षत्रवन, आयुर्वेद वन, हिलिंग फॉरेस्ट, संस्कृतीवन इत्यादी. पुराणात वाचलेल्या कथांमधून अनेक वृक्षांची नावे आपल्याला फक्त माहीत असतात पण आपण ती बघितलेली नसतात. श्रीकृष्णाच्या आवडीचा कदंब वृक्षही तिने अनेक ठिकाणी लावला आहे. या प्रत्येक झाडाजवळ त्यांची माहिती दिली आहे. आता तिला गोष्टी सांगणारी झाडे असा उपक्रम हाती घ्यायचा आहे. तिचे "सिक्रेट्स ऑफ युवर अर्बन बॅकयार्ड" नावाचे पुस्तक ८ मार्चला जागतिक महिला दिनी प्रकशित झाले आहे.

तिला छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान असलेले शिवनेरी किल्ल्याच्या सौंदर्यीकरणाचे काम मिळाले. तिथे झाडे टिकत नाहीत. जी काही झाडे येतात त्यांनाही वणवा लागतो असे समजले. तिने तिथल्या खडकाची मातीची पाहणी केली. सुबाभूळ आणि विविध जातीचे गवत तिथे वाढले होते. ही झाडे आतून पोकळ आणि हलकी असतात. त्यामुळे त्यांना सहज आग लागू शकते. मग तिने तिथे दाट छाया देणारी झाडे लावली. अशा ठिकाणी छोटी रोपे लावून चालत नाहीत. कारण ती तगत नाहीत. किमान अडीच इंच जाड बुंधा असणारी झाडे लावावी लागतात. कारण काही कारणाने झाडांना पाणी मिळाले नाही तर त्यांच्या बुंध्यात त्यांना काही दिवस पुरेल असा खाऊ असतो. आता असीमच्या शास्त्रशुद्ध आणि कल्पक प्रयत्नामुळे शिवनेरीचा परिसर हिरवागार झाला आहे.

गोदावरी नदी आणि पवई लेकचे काम तिने केले आहे. जिथे एवढा मोठा जलनिधी आहे तिथे काही वेगळी दक्षता घ्यावी लागली का असे विचारल्यावर ती म्हणाली, 'जिथे पाणी जास्त असते त्या ठिकाणी जास्त पाणी पिणारे वृक्ष लावावे लागतात. नाही तर इतर प्रकारची झाडे तिथे लगेच कुजून जातात. मला आवडणारी जंगली बदामाची झाडे मी इतर ठिकाणी लावते. पण पाण्याजवळ ती लावायची नसतात. कारण या झाडाची पानगळ फार होते तेव्हा ही पाने पाण्यात पडतात आणि या झाडांवर 'भुऱ्या' रोग पडतो. त्यामुळे पाणी दूषित होते.'

आज महाराष्ट्रात अनेक ठिकाणी असीमने फुलवलेली जंगले आपल्याला बघायला मिळतात. प्रत्येक जंगलात फळे देणारी, फुले येणारी, झाडे आहेत. छान मातीचे रस्ते आहेत. इथे मुले येतात, खेळतात. प्रसंगी झाडावरची फळे तोडतात. जिथे लहान मुलांचे पार्क असते तिथे असीम आवर्जून पेरूची झाडे लावते. ही झाडे मजबूत असतात. बुटकी असल्याने मुले त्यावर चढू शकतात. मुलांना पेरू आवडतात आणि पेरू वर्षभर येतात. नगर विकास विभागाच्या प्रधान सचिव मनीषा म्हैसकर यांचा असीम मोठ्या आदराने उल्लेख करते. त्यांच्यासारख्या द्रष्ट्या अधिकाऱ्यामुळे मला चांगली कामे करता आली असे ती आवर्जून सांगते.

एकेकाळी दंडकारण्यासारख्या गर्द जंगलांचे सुख पाहिलेल्या महाराष्ट्राला पुन्हा पहिले वैभव प्राप्त करायचे असेल तर अशा अनेक असीम निर्माण झाल्या पाहिजेत. तिच्यासारखे शास्त्रशुद्ध आणि कल्पक प्रयोग केले तरच एकेका झाडाचे रक्षण करण्यासाठी कठोर कायदे करणाऱ्या शिवरायांच्या या राज्यात फळाफुलांनी बहरलेली, जिवंत, नांदती, जंगले तयार होतील आणि येणाऱ्या पिढ्यांना त्याची मधुर फळे चाखायला मिळतील.

aseemgokarn@gmail.com

# कोकणचा ज्ञानेश्वर : संत सोहिरोबानाथ



**कोकण आयकॉन**

**सतीश पाटणकर**

तळ कोकणावरच्या नाथ संप्रदायाच्या प्रभावाचं ठसठशीत उदाहरणं म्हणजे संत सोहिरोबानाथ त्यांच्या काव्याचा आणि विचारांचा गाभा वारकरी प्रेरणेचाच आहे. म्हणूनच बा. भ. बोरकर त्यांना 'कोकणचा ज्ञानेश्वर' म्हणतात. 'हरिभजनाविण काळ घालवू नको रे, अंतरिंचा ज्ञानदिवा मालवू नको रे' हे गाणं कुणाचं? या प्रश्नावर शेकडा नव्याण्णवांचं उत्तर असतं पंडित जितेंद्र अभिषेकी. पण यातला सगळ्यांना भावणारा संदेश आहे, संत सोहिरोबानाथांचा.

संत सोहिरोबानाथ मराठी साहित्य सृष्टीलाच नव्हे तर हिंदी साहित्यातही या दिव्यत्वाने भरभरून दिले आहे अशा चमत्काराचे नाव आहे संत सोहिरोबा नाथ. सोहिरोबांचे मूळ आडनाव संझगिरी. सावंतवाडी संस्थानातील पेडणे महालातील स्थलांतरित झालेले हे कुटुंब. कुठ्ठाळीहून हे कुटुंब स्थलांतरित झाले ते सावंतवाडी संस्थानातील पेडणे महालातील पालये गावात. तेथे त्यांना आंबिये हे गोड उपनाव मिळाले. इ. स. १७१४ मध्ये त्यांचा जन्म झाला. नाव ठेवण्यात आले अच्युत. योग्यांची साक्षात लक्षणे घेऊनच हे अलौकिक बाळ जन्माला आले. कुलकर्णी पद त्यांच्याकडे वडिलांकडून चालत आलेले. पुढे ते बांदा येथे मातोश्रीसह राहू लागले. मात्र परमेश्वराच्या चिंतनाखेरीज त्यांना दुसऱ्या कशात गोडी लागेना.

मुलाला एखाद्या दिवंगत पूर्वजाचे नाव ठेवण्याची परंपरा आजही कोकणात आहे. या परंपरेप्रमाणे सोहिराबानाथांचे नाव ठेवण्यात आले. मात्र प्रेमाने त्यांना सोयरू अशी घरातील ज्येष्ठ मंडळी हाक मारायची आणि घरातले सोयरू सोहिरोबानाथ झाले. बांदे ऊर्फ एलिदाबाद हा तेव्हा शहरवजा गाव होता. सावंतवाडीच्या जवळच्या या गावात सोहिरोबानाथांचे कुटुंब वस्तीला आले. आंबिये मंडळी या नव्या गावी आली तेव्हा सोहिरोबांची मुंज झालेली होती. तत्कालीन समाजावर नाथ संप्रदायाचा मोठा पगडा या भागात असल्याचे दिसून येतो. सोहिरोबानाथही यातून सुटले नाहीत. त्यांच्यावर गोरक्षनाथाचा मोठा प्रभाव. सोहिरोबांना गुरूमंत्रही त्यांनीच दिला. त्यांच्या उपलब्ध कवितेत गोरक्षनाथांवरचे एकच पद आठवते. याच्या उलट गैबीनाथासंबंधीचे उल्लेख वारंवार आढळतात. मग हा गैबीनाथ कोण प्रश्न समोर येतो. मराठी वाङ्मयाचा अधिक अभ्यास करताना दोन गैबीनाथ आढळतात. कै. बा. भ. बोरकर यांनी याची उकल करण्याचा बराच प्रयत्न केला आहे. या दोन गैबीनाथांपैकी एक गहिनीनाथ आणि दुसरे ज्ञानेश्वरांचे शिष्य सत्यामलनाथांचे यांचे शिष्य गैबीनाथ. महाराष्ट्र भाषाभूषण आजगावकर यांच्या मते गोरक्ष शिष्य गहिनीनाथ हेच सोयरोबांचे गुरू होते. हिंदू लोक त्यांना गैबीनाथ आणि मुसलमान त्यांना गैबी पीर असे म्हणतात. सोहिरोबानाथांबद्दल अधिक जाणण्याचा जेव्हा प्रयत्न होतो तेव्हा पावला-पावलावर आश्चर्याचा धक्का बसतो. इतिहासकारही चकित व्हावेत, असे एक एक दाखले मिळू लागतात. आपले उभे आयुष्य ईश्वर भक्तीत व्यस्त असताना वंशपरंपरागत आपल्याकडे कुळकर्णीचे काम आले आहे. ते नेटाने आणि प्रामाणिकपणे केले पाहिजे, याची त्यांना जाणीव होती. त्यांनी वयाच्या पंधराव्या वर्षी हे काम सुरू केले. २० वर्षे इमाने-इतबारे चालविल्यानंतर आता पुढे यातच रमणे योग्य नाही, असे समजून त्यांनी या कामांचा राजीनामा दिला.

चरित्रकारांमध्ये अनेक मतप्रवाह आहेत. त्यांना साक्षात्कार झाला. नंतर त्यांनी चाकरी सोडली असेही कुणी म्हणतात, तर कुणी ईश्वर भक्तीत



व्यस्त असताना जाणीवपूर्वक त्यांनी काम करण्याचे टाळले असेही म्हटले जाते. येथे तर्क आणि अनुमान लावण्याचा प्रयत्न केला तर असेही लक्षात येते की, सोहिरोबानांचे वडील निवर्तले किंवा अपंग तरी झाले असावेत. अनेक ग्रथांत त्यांची आई, एक विधवा बहीण, पत्नी आणि दोन मुलगे यांचा संदर्भ सापडतो. त्यांना एक भाऊही होता. त्यांचे वंशज आजही बांद्याला आहेत. अल्पवयात कुटुंबाचा बोजा शिरावर घेणाऱ्या सोहिरोबानाथांना कोकणच्या दलित मुलखातून कुळकर्णीची नोकरी सालसपणे, इमाने-इतबारे केल्याचे इतिहासकार सांगतात.

घरच्या गरिबीमुळे आपल्या कवितांसाठी लागणारा कागदही ते विकत घेऊ शकत नव्हते. त्यांची बहीण फणसाच्या कोवळ्या पानांवर ते लिहून त्यांचे पेळे नीट लावून ठेवत असे. एकदा या उभयतांच्या अनुपस्थितीत त्यांच्या आईने पाचोळा समजून सरळ न्हाणीच्या चुलीत घातले होते. अशा ओढग्रस्त स्थितीत सोहिरोबांनी तेवढी प्रचंड साधना कशी केली असेल, याचा अचंबा वाटतो. भस्मसात झालेल्या कवितेबद्दल त्यांच्या तोंडून दुःखाचा उद्गारही निघाला नव्हता, असे त्यांच्या भगिनीने लिहून ठेवल्याचेही इतिहासकार सांगतात. सोहिरोबानाथ यांच्याबाबत एक किस्सा सांगितला जातो, त्या दिवशी कडक ऊन होते.



सावंतवाडीतून राजेसाहेबांचे तातडीचे निमंत्रण आले. फणस घेऊन नाथ निघाले. इन्सुली मेटाच्या खाली विश्रांतीसाठी वडाच्या झाडाखाली ते थांबले. फणस फोडला. आता गरे खाणार, एवढ्यात त्या वनातून स्पष्ट आवाज 'बाबू हमको कुछ देता है?' तेव्हा नाथांनी या आपण तृप्त व्हा, असे सांगितले. स्वरांची जागा आकृतीने घेतली. भव्यपुरुष, नाथपंथी वेश योग्याने फणसाची चव चाखली. पाच गरे सोहिरोबांना दिले. योग्याने 'मी गहिनीनाथ, गैबीनाथ, तुझे वैराग्य पाहून संतुष्ट झालो. तू यापुढे अच्युत आंबिये नव्हेस, तू सोहिरोबा सोऽहं मंत्राचा जप कर. अमर होशील' असा आशीर्वाद दिला. हा गहिनीनाथांचा साक्षात्कार नाथांच्या जीवनातील परिवर्तनबिंदू ठरला. सावंतवाडी दरबारात जाऊन त्यांनी राजाकडे राजीनामा दिला अन् पुन्हा बांद्याची वाट धरली. यावेळी नाथांच्या मुखातून अनेक पदे निर्माण होऊ लागली. पण नाथांनी ती लिहून ठेवली नाही. मात्र, आज जी शेकडो पदे उपलब्ध आहेत ती नाथांच्या भगिनीने लिहून घेतलेली. नाथांच्या सान्निध्यात राहून तोंडावाटे बाहेर पडणारी संतवाणी ती लिहून घेई. पुढे मग गुरुकृपेने आलेला आत्मानुभव शब्दबद्ध होऊन गीतबद्ध होऊ लागला.

सोहिरोबांचे मराठी, हिंदी, संस्कृत आणि कोकणी या चारही भाषांवर असाधारण प्रभुत्व होते. ज्ञानेश्वरीचाही त्यांच्यावर मोठा पगडा होता. त्यांच्या हिंदी कविताही अभ्यासताना तिच्यातील प्रसाद आणि लय विस्मयचकित करणारी आहे. सिद्धांत संहिता हा त्यांचा मूळ ग्रंथ संस्कृत आहे आणि तोही काव्यात्मक आहे. या सूत्रात्मक ग्रंथावर त्यांनी ओवी भाष्य लिहिले आहे. त्यात त्यांचा पूर्वसुरीचा सिद्धांत ग्रंथाचा गाढा अभ्यास दिसतो. त्यांच्या रचना वाचताना वेद, उपनिषदे, षड्दर्शने, ब्रह्मसुत्रे, भगवतगीता, संस्कृत धर्म ग्रंथ, प्राकृत काव्ये, पुराणे यांचा त्यांनी बारकाईने अभ्यास केला असावा, असे वाटते. सोहिरोबांची उपलब्ध पदसंख्या ७०० च्या आसपास आहे. त्यातील बहुसंख्य पदे राग तालातली आहेत. त्यातले काही राग जितके अन्वट आहेत, तितकेच काही ताल बिकट लयीतले आहेत. बा. भ. बोरकर यांनी सोहिरोबानाथांच्या सर्व पदसंख्यांचा अभ्यास करताना नव्या पिढीसमोर ते अधिकाधिक पोहोचायला हवेत म्हणून मोठे प्रयत्न केले होते. सोहिरोबानाथांची काव्यस्फूर्ती आणि त्यांनी रचलेला 'चिजा' यांचाही अभ्यास व्हायला हवा. म्हणजे प्रगल्भतेचा साक्षात्कार होईल. या सिद्धीच्या मागे दीर्घ साधना असलीच पाहिजे.

**हरिभजनाविण काळ घालवू नको रे ।।१।।**
**दोरीच्या सापा भिवुनी भवा।**
**भेटी नाही जिवा-शिवा।**
**अंतरीचा ज्ञानदिवा मालवू नको रे ।।२।।**

अशी अनेक रसाळ पदे निर्माण करून कोकणासह संपूर्ण उत्तर भारतात नाथपंथाची ध्वजा लावणारे श्री संतश्रेष्ठ सद्गुरू सोहिरोबानाथ आंबिये यांना इन्सुली (ता. सावंतवाडी) मेटाच्या पायथ्याशी असलेल्या विस्तीर्ण वटवृक्षाच्या सावलीत सोहिरोबांना गहिनी नाथांचा कृपाप्रसाद लाभला. तेथेच नाथभक्तांनी त्यांचे भव्य मंदिर उभारून त्यांची स्मृती जोपासली आहे. वैशाखी पौर्णिमेला येथे आत्मसाक्षात्कार दिन हजारो भाविकांच्या उपस्थितीत दरवर्षी होतो.

गुरुकृपेमुळे व शब्दज्ञान प्रावीण्यामुळे आत्मप्रचितीचे पारमार्थिक ग्रंथ नाथांनी लिहिले. सिद्धांत संहिता, महद्नुभवनेश्वरी, अद्वयानंद, पूर्णाक्षरी, अक्षयबोध यांचा त्यात समावेश आहे. वाचा सिद्धी प्राप्त झालेल्या या नाथांची ग्रंथ संपत्ती ही चाळिशीच्या आतील आहे. संसार करता करता मुक्ती मिळविता येते आणि नंतर संसार चालवला तरी मुक्तावस्थेत बाधा येत नाही. हाच धडा त्यांनी संसारीजनांना दिला. तत्पूर्वी होडावडे (वेंगुर्ले) येथील नाथभक्त कै. भगवंत बाळकृष्ण पै रायकर यांनी नाथांची पदे, वाङ्मय छापले. त्यानंतर कै. वैजनाथ कुलकर्णी यांनी पदसंग्रह छापले. नाथवंशज प्रा. द. अ. आंबिये यांनीही नाथांची पदे सर्वदूर पोहोचण्यासाठी अनेक पुस्तके लिहिली. सोहिरोबांची ही पदे जात्याच श्राव्य आहेत.

सोहिरोबा वयाच्या साठाव्या वर्षी आपल्या दोघाही मुलांसह घर सोडून निघाले. उज्जैनपर्यंत ते पोहोचल्याचा तपशील मिळतो. उज्जैनचा मठ बांधून होण्यापूर्वी सोहिरोबांचा मुक्काम तेथील एका धर्मशाळेत होता. दिवसा त्यांचा बहुतेक वेळ समाधी अवस्थेत जाई. शके १७१४ म्हणजे सन १७९२ च्या चैत्र शुद्ध नवमीला सोहिरोबा एकाएकी अदृश्य झाले ते कुठे गेले याचा कुणालाच थांगपत्ता नाही. रात्री झोपलेले त्यांना सर्वांनी पाहिले, सकाळी बिछान्यावर ते दिसले नाहीत.

**(लेखक मुख्यमंत्र्यांचे माजी माहिती अधिकारी आहेत.)**

# बीडमध्ये उसळणार भीमसागर!

**जयंती** | **बीड पोलिसांचा राहणार तगडा बंदोबस्त**



पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती आज सोमवार (दि.१४) एप्रिल रोजी बीड शहरासह जिल्ह्यात मोठ्या उत्साहात पार पडणार आहे.त्या अनुषंगाने बीड शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यासाठी जनसागर लोटणार असून दिवसभर पोलिसांचा तगडा बंदोबस्त असणार आहे

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती विश्वातल्या अनेक देशात साजरी केली जात असून बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त बीड शहरात ४ एप्रिल १४ एप्रिल या कालावधीत विविध कार्यक्रम डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीकडून आयोजित करण्यात आले होते. त्या सर्व कार्यक्रमांना अतिशय उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथून सोमवार (दि१४) एप्रिल रोजी सकाळी ८ वाजता अभिवादन रॅली काढली जाणार आहे. सदरील रॅली डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा इथपर्यंत काढली जाणार आहे. त्यानंतर सकाळी ९ वाजता पंचशील ध्वजारोहण करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले जाणार आहे. सायंकाळी सहा वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक निघणार आहे. या मिरवणुकीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीचा रथ तसेच शहरातील जवळपास शंभर जयभीम महोत्सव उत्सव समित्या मिरवणुकीत सहभागी होणार आहेत.

### असा असणार पोलीस बंदोबस्त

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीसाठी पोलीस अधीक्षक नवनीत यांनी तगडा पोलीस बंदोबस्त ठेवला असून तब्बल १०५० पोलीस कर्मचारी तैनात असणार आहेत. त्यामध्ये ११५ पोलीस कर्मचारी, दंगल नियंत्रण पथक ६, राज्य राखीव दल पथक, ८५० होमगार्ड असा पोलीस बंदोबस्त असणार आहे.

### पांढरे वस्त्र परिधान करुन समाज होणार सहभागी!

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी आंबेडकरी जनता, बौद्ध उपासक- उपासिका पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून अभिवादन रॅलीसह जयंती मिरवणुकीत सहभागी होणार आहेत.

### या ठिकाणाहून निघणार अभिवादन रॅली,मिरवणूक

बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथून सकाळी आठ वाजता अभिवादन रॅली काढली जाणार आहे. ही अभिवादन रॅली, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती आणि भारतीय बौद्ध महासभा यांच्यासह शहरातील बौद्ध विहार कमिट्यांकडून काढली जाणार आहे.

## गेवराईत पत्रकाराचे घर फोडले

घटना:गेवराईत चोरट्यांचे पोलिसांसमोर आव्हान



पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड: घरात कोणी नसल्याचा फायदा घेत पत्रकाराचे घर फोडून सोन्याचांदीच्या दागिन्यांसह नगदी रोकड असा एकूण सत्तर हजार रुपयांचा मुद्देमाल अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना मंगळवार दि. ८ एप्रिल २०२५ रोजी पहाटेच्या सुमारास ताकडगाव रोड, केशरदीप निवास गेवराई येथे घडली आहे. याप्रकरणी अज्ञात चोरट्याविरुद्ध गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून घटनेचा पुढील तपास गेवराई पोलीस करत आहेत.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, गेवराई शहरातील मतिमंद निवासी विद्यालय,गेवराई येथे कार्यरत असलेले शिक्षक व दैनिक लोकाशाचे पत्रकार विनोद नामदेव पौळ रा. सुशी (व), हल्ली मुक्काम ताकडगाव रोड केसरदीप निवास गेवराई हे पत्नी व मुलांसह गेल्या सहा-सात वर्षांपासून गेवराई येथे राहतात तर दि.७ एप्रिल २०२५ रोजी दुपारी ३.३० वा. चे सुमारास पत्नीस शारदा हॉस्पीटल, गेवराई येथे प्रस्तुतीसाठी अँडमीट केल्याने घराला कुलूप लावून पान २ वर

## जयभिम महोत्सवात नृत्य स्पर्धा

जयंती: कलाकारांच्या कलागुणांना मिळाली संधी



पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे, जयभीम महोत्सवात नृत्य स्पर्धा पार पडली. या स्पर्धेला अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला होता. बीड येथील सामाजिक न्याय भवन येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्ताने ४ ते १४ एप्रिल या कालावधीत जयभिम महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने या जयभिम महोत्सवात विविध स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. त्यामध्ये नृत्य स्पर्धा उत्साहात पार पडली.

यावेळी नृत्य स्पर्धा समितीचे प्रमुख तथा आयोजक अजय सवाई यांच्या उपस्थितीत सदरील स्पर्धा पार पडली. या नृत्य स्पर्धेला उदघाटक म्हणून शिक्षण विस्तार अधिकारी भगवान सोनवणे, प्रमुख पाहुणे प्रा. वसंत ओगले , समितीचे अध्यक्ष गौतम चोपडे, अरुणाताई आठवले , बबन भाऊ वडमारे, अशोक वीर ,गोटू वीर ,, अजय सरवदे, प्रमोद शिंदे, रवी वाघमारे, राजू महुवाले, प्रशांत ससाणे,मनोज वाघमारे, सुमेध जोगदंड,अमरेंद्र विद्यागर , सचिन सोनवणे, राहुल कांबळे ,बंधू निसर्गंध, विशाल सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती. स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने मोलाचे परिश्रम घेतले.

## संत नामदेव महाराज सप्ताह!

आवाहन:भाविक-भक्तांनी लाभ घ्यावा

पुण्यभूमी प्रतिनिधी



केज:तालुक्यातील चिंचोली माळी येथे श्री संत नामदेव महाराज अखंड हरिनाम सप्ताहाला आज दि.१३/ ०४/२०२३ रोजी सुरवात झाली आहे तरी चिंचोली माळी पंचक्रोशीतील भावि भक्तांनी अखंड हरिनाम सप्ताहाचा लाभ घ्यावा असे आवाहन गावकऱ्यांनी केले आहे तरी सप्ताह निमित्त पहिल्या दिवशी किर्तनरुपी सेवा संध्याकाळी ९ ते ११ ह.भ.प. महंत भगवान महाराज पुरी यांची होईल तसेच दुसऱ्या दिवशी ह.भ.प. दत्ता महाराज तांदुळवाडीकर तसेच तीसऱ्या दीवशी ह.भ.प. प्रेममुर्ती समाधान महाराज शर्मा तसेच चौथ्या दीवशी ह.भ.प. आप्पा महाराज जावळे हाळदगांवकर तसेच पाचव्या दिवशी ह.भ.प. नामदेव महाराज रेंगे परभणी तसेच सहाव्या दिवशी ह.भ.प. राजेंद्र महाराज सदगीर अकोले तसेच सातव्या दिवशी ह.भ.प. शिवाजी महाराज बावस्कर गाडेगांव तसेच सप्ताह सुरू आहे तीन टाईम पंगत असेल पत्रीके प्रमाणे व शनिवार दिनांक १९/०४/२०२५ रोजी दुपारी १२ वाजता गाड्या ओढण्याचा कार्यक्रम पान २ वर

## येडेश्वरीच्या दारी भक्तीचा महापुर

अध्यात्मिक: लाखो भाविकांनी घेतले दर्शन

पुण्यभूमी प्रतिनिधी



कळंब:महाराष्ट्राची कुलस्वामिनी श्री. तुळजा भवानी ची धाकटी बहीण म्हणून परिचित असलेले कळंब तालुक्यातील येरमाळा येथील येडेश्वरी देवीच्या चैत्र यात्रा महोत्सवास प्रारंभ झाला पौर्णिमेनिमित्त देवीच्या दर्शनासाठी व पुरणपोळीचा नैवेद्य दाखवण्यासाठी मुख्य मंदिरावर गर्दी केली होती यात्रेच्या पहिल्या दिवशी लाखो भाविक दाखल झाले होते संध्याकाळी चैत्र पौर्णिमा महापूजा व रात्री दहा वाजता देवीचा छबिना मिरवणूक पूजा आणि महाआरती झाली त्यानंतर भाविकांनी देवीला पुरणपोळीचा नैवेद्य दाखविला व भक्ताने आई राजा उदो उदो चा जयघोष करीत दर्शन घेतले रखरखत्या उन्हाची पर्वा न करता मंदिरापर्यंत पायी चालत दर्शन रांगा लागल्या होत्या महाराष्ट्रासह आंध्रा, कर्नाटक राज्यातून पहिल्या दिवशी सुमारे तेरा ते चौदा लाख भाविक येरमाळ्यात दाखल झाले होते राष्ट्रीय महामार्गावर भाविकांच्या वाहनाच्या लांबलचक रांगा लागल्या होत्या त्यामुळे येरमाळा येथे वाहनाची गर्दी मोठ्या प्रमाणात वाढली होती येरमाळा नगरी भाविकांच्या गर्दीने फुलून गेली आहे यावेळी ठिकठिकाणी पोलिसांचा तंगडा बंदोबस्त असल्याने यात्रेला छावणीचे स्वरूप दिसून पान २ वर

## जयभीम महोत्सवात १८ तास वाचन

उपक्रम: विद्यार्थ्यांनी नोंदविला उत्स्फूर्त प्रतिसाद



पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:राज्याला आदर्श घालून दिलेल्या बीड जयभिम महोत्सवात १८ तास वाचन करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. वाचन केल्याने मस्तक सुधारते आणि सुधारलेले मस्तक कोणापुढेही नतमस्तक होत नाही. त्यामुळे १८ तास वाचनाचा उपक्रम राबविण्यात आला असून विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.बीड शहरातील सामाजिक न्याय भवन येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्ताने ४ ते १४ एप्रिल या कालवधीत जयभिम महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने गुरुवार (दि.११) एप्रिल रोजी तुलसी संगणक शास्त्र महाविद्यालयात १८ तास वाचन उपक्रम राबविण्यात आला होता.

वाचन समितीचे सुमिध जोगदंड, प्रा. अशोक गायकवाड, स्वप्नील चोपडे यांनी १८ तास वाचन यासाठी सुयोग्य नियोजन केले होते.या उपक्रमात वंदनाताई काशिनाथ वाघमारे,मंदाताई पान २ वर

## कापरेवाडीत रस्त्याची केली सुधारणा

दखल:दैनिक पुण्यभूमी बातमीचा दणका





Page 6

07 Apr 2025

पुण्यभूमी

कापरेवाडीत रस्त्याची लावली वाट !

सवाल:सीईओ साहेब खड्डे तुम्ही निट करणार का गुत्तेदार ?

पुण्यभूमी प्रतिनिधी

पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:तालुक्यातील जलजिवन कामात अंदाजे लाखो, करोडो रुपयांचा भ्रष्टाचार करुन गावातील सिमेंट रस्ते खोदून गुत्तेदार निधी उचलून शेंगा हानणत आहे सीईओ आदित्य जिवणे साहेब अशा गुत्तेदारांना पाठीशी घालणार का तुम्ही पन त्यांच्या यादीत जानार व अर्धवट बोगस कामे करणाऱ्या गुत्तेदाराचा मनमानी कारभार सुरू ठेवणार असा प्रश्न नागरिकांना पडला आहे कारण अगोदरच गाव छोटे आहे व त्यांमध्ये गावातील गल्ली बोळात जलजिवनच्या कामात रोड खोदले आहेत त्यामुळे गावातुन साधी मोटरसायकल सुध्दा चालवायची समस्या गंभीर झाली आहे तसेच लाखो रूपयांची योजना कापरेवाडीसाठी जलजिवन योजने अंतर्गत मंजूर करण्यात आली आहे परंतु गावांमध्ये पान २ वर



माजलगाव:मंत्री मेघना -बोर्डीकर माजलगाव ठिकाणी कार्यक्रमानिमित्त आल्या असताना त्यांचा सत्कार करताना वणवा लघु चित्रपटातील अभिनेत्री प्राची सोनवणे, पत्रकार बाळासाहेब आडागळे, परमेश्वर सोळंके अमर साळवे, संतोष रासवे आदी.

**जयभीम महोत्सव** | **धम्मसंगिनी रमागोरख यांचे परखड मत**

## आमचा आजही सर्वांगिण विकास नाही

पुण्यभूमी प्रतिनिधी




बीड:भारतीय संविधान जगात श्रेष्ठ असून प्रत्येक घटकाला त्यामुळे न्याय मिळाला आहे. एवढे महान कार्य घटनाकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. परंतू संविधान राबविणाऱ्या यंत्रणेकडून आजही आमच्या आर्थिक सशक्तीकरणासाठी ठोस भूमिका घेतल्याचे दिसत नाही.त्यामुळे आमचा सर्वांगिण विकास झाला आहे असे म्हणता येणार नाही. असे परखड मत धम्मसंगिनी रमागोरख यांनी व्यक्त केले.

बीड शहरातील सामाजिक न्याय भवन येथे, दि.४ ते १४ एप्रिल रोजी या कालावधीत जयभीम महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने शनिवार (दि.१२) एप्रिल रोजी व्याख्यान मालेचे आयोजन करण्यात आले होते.त्यावेळी धम्मसंगिनी रमागोरख बोलत होत्या.या व्याख्यान माला कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून मैनाताई बोराडे उपस्थित होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून मनिषा तोकले, सुशीलाताई मोराळे,सिमा ओस्तवाल आदींची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित आंबेडकरी जनतेस संबोधित करतांना धम्मसंगिनी रामगोरख म्हणाल्या की,आंबेडकरवादी महिलांच्या सामाजिक आणि आर्थिक सशक्तीकरणाचा प्रश्न म्हणावा तेवढा सुटलेला नाही.धम्मसंगिनी असही म्हणाल्या की, बाबासाहेबांनी आपल्याला बौद्ध धम्म देवून प्रज्ञा, शिल, करुणा रुजविली आहे.तसेच संविधान पान २ वर

